## क्रेडिट कार्ड सुविधांच्या नियामक शर्ती आणि अटी

या शर्ती व अटी आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या क्रेडिट कार्ड सुविधा प्रदान करण्यास लागू असून त्याचे नियमन त्या करतात.

### I. व्याख्या आणि कार्यक्रम

- **"संलग्न"** चा अर्थ आणि त्यामध्ये समाविष्ट आहेत :
  - कुठलीही कंपनी जी आयसीआयसीआय बँकेच्या मालकीची किंवा तिची उपकंपनी (साहाय्यक) आहे, किंवा
  - व्यक्ती जी आयसीआयसीआय बँकेच्या नियंत्रणाखाली आहे किंवा सामाईक नियंत्रणाखाली आहे, किंवा
  - कुठलीही व्यक्ती, तिच्या 26% किंवा त्यापेक्षा जाजत रोख्यांवर आयसीआयसीआय बँकेला प्रत्यक्ष वा लाभहिताचे नियंत्रण आहे.

संलग्नची व्याख्या करण्याच्या उद्देशाने, **"नियंत्रण"** जेव्हा व्यक्तीसंदर्भात उपयोगात आणले जाते, तेव्हा त्याचा अर्थ त्या व्यक्तीच्या व्यवस्थापन आणि धोरणांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या निर्देशन करण्याचा अधिकार जो एकतर रोखेवहनाच्या स्वामीत्वातून, कराराद्वारे किंवा अन्य कुठल्याप्रकारे प्राप्त असा होतो आणि **"व्यक्ती"** म्हणजे कुठलीही एक व्यक्ती, कंपनी, फर्म, महामंडळ, भागीदारी, प्रन्यास किंवा इतर कुठलीही अस्तित्वातील संस्था वा संस्था किंवा इतर नैसर्गिक किंवा वैध व्यक्ती.

- **"अर्जदार"** म्हणजे व्यक्ती (अनेक व्यक्ती) ज्याने /ज्यांनी आयसीआयसीआय बँकेकडे कार्डासाठी रीतसर अर्ज केलेला आहे. कॉर्पोरेट क्रेडिट कार्ड संदर्भात त्याचा अर्थ व्यती /अनेक व्यक्ती ज्यांची नावे कंपनीसादर अर्जात नमूद आहेत, असा होईल.
- **"अधिकृत विक्रेता"** हा अर्थ वेळोवेळी संशोधित, विदेश विनिमय व्यवस्थापक कायदा, 1999, यामध्ये परिभाषित अधिकृत विक्रेता.
- **"व्यवहार दिन"** याचा अर्थ असा दिवस ज्या दिवशी विनंती–अर्जात निर्दिष्ट करण्यात आलेले संबंधित आयसीआयसीआय बँक कार्यालय किंवा ज्या मार्फत कार्ड प्रदान केले जाते किंवा इतर असे कार्यालय, ज्याची अधिसूचना कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेमार्फत दिली जाऊ शकते आणि जे सर्वसाधारण व्यवसाय व्यवहारांसाठी खुले राहील.
- **"कार्ड"** किंवा **"क्रेडिट कार्ड"** किंवा **"इएमआय कार्ड"**किंवा **"कॉर्पोरेट क्रेडिट काड"** किंवा **"ऑनलाईन क्रेडिट कार्ड"** किंवा **"बिझनेस कार्ड"**याचा अर्थ आयसीआयसीआय बँक व्हिसा/एएमईक्स/मास्टर कार्ड क्रेडिट कार्ड अथवा इतर कुठलेही क्रेडिट कार्ड जे आयसीआयसीआय बँकेद्वारे अर्जदाराच्या विनंतीवरून जारी केले जाते.
- **"एपीआयएन"** याचा अर्थ व्यक्तीगत ओळख क्रमांक, ज्याचे वाटप कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेद्वारे केले जाते किंवा ज्याची निवड कार्डधारक/आयसीआयसीआय बँक यांच्याद्वारे वेळोवेळी कार्डसंबंधात केली जाते.
- **"कार्ड खाते"** याचा अर्थ कार्डधारकाच्या नावे उघडण्यात आलेले खाते आणि इथे अंतर्भूत शर्ती आणि अटींनुसार, आयसीआयसीआय बँकेद्वारे क्रेडिट कार्ड वापराच्या प्रयोजनार्थ चालू स्थितीत ठेवण्यात आलेले खाते.
- **"रोख सीमा"** याचा अर्थ आयसीआयसीआय बँकेद्वारे परिभाषित किंवा विहित केलेली किमान रोख रक्कम किंवा समतूल्य रक्कम, जी कार्डधारक त्याच्या कार्डखात्यातून काढू शकतो. रोख–सीमा ही कार्डधारकाच्या पत–मर्यादा/खरेदी मर्यादा यांचा उप समुच्चय घडवते.
- **"चार्जेस** किंवा **आकार"** म्हणजे येथे दिलेल्या नियम 6 अन्वये किंवा येथे उल्लेख केलेल्या अटी व नियमांनुसार आकारण्यात येणारी शुल्के. येथे नमुद केलेले शुल्कांचे सर्व तपशील परिपत्रकात दिल्यानुसार असतील, नसल्यास, वेळोवेळी त्यात होणारे बदल कार्डधारकाला खास करून कळवण्यात येतील.

- **“कंपनी”** म्हणजे 1956 सालातील कंपनी कायद्यानुसार व्याख्या केल्याप्रमाणे कंपनी, ज्यात वेळोवेळी बदल केले जातात आणि कॉरपोरेट क्रेडिट कार्डाच्या हेतूसाठी असलेले अर्जदार.
- **“शुल्क”** (Charges) किंवा **“शुल्क”** (charges) याचा अर्थ असे शुल्क जे इथे कलम तख मध्ये योजलेले आहे किंवा जे या शर्ती आणि अटींमध्ये कुठेही नमूद करण्यात येते. इथे नमूद शुल्कांचा सर्व तपशील हा कार्डधारकाला निर्दिष्टरीत्या कळविला नसल्यास, वेळोवेळी संशोधित प्रशुल्क जोडपत्रात (टॅरीफ ॲनेक्शर) नमूद केल्याप्रमाणे राहील.
- **“पत-मर्यादा/खरेदी मर्यादा”** म्हणजे अशी मर्यादा जिच्यापर्यंत कार्डधारक हा क्रेडिट कार्डने खर्च करण्यास प्राधिकृत आहे.
- **“आयसीआयसीआय बँक”** याचा अर्थ आयसीआयसीआय बँक लिमिटेड, क्रेडिट कार्डचे स्वामी (मालक), त्यांचे उत्तराधिकारी आणि परवानगीकृत नेमणूकदार (असायनीज्) असा होईल.
- **“आयसीआयसीआय बँक 24- तास** ग्राहक सेवा केंद्र**”** हे आयसीआयसीआय बँकेची फोन बँकिंग सेवा ज्या कार्डधारकांना आयसीआयसीआय बँकेद्वारे प्रदान करण्यात येते, त्यासाठी संदर्भित आहे.
- **“इन्फिनिटी”** ही आयसीआयसीआय बँकेची इंटरनेट बँकिंग सेवा/वेबसाईट जिचा युआरएल www.icicibank.com आहे आणि जी आयसीआयसीआय बँकेच्या स्वामित्वाची, द्वारे प्रतिष्ठापित आणि सुयोग्यरीत्या संचालित आहे, अशा व्यापार-नामाशी संदर्भित आहे.
- **“विमा कंपनी”** याचा अर्थ आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड किंवा आयसीआयसीआय बँक वेळोवेळी निश्चित करू शकेल, अशी इतर कोणतीही विमा कंपनी.
- **“सदस्य”** किंवा **“कार्डधारक”** किंवा **“कार्ड-सदस्य”** याचा अर्थ ज्याला त्याचे नाव असलेले कार्ड निर्गमित केले जाते आणि जो असे कार्ड धारण करतो.
- **“व्यापारी (मर्चंट) प्रतिष्ठान”** याचा अर्थ जेथे कुठे स्थित अशी संस्थापना जी कार्डाचा स्वीकार करते आणि ज्यामध्ये इतरांसह भांडारे, उपहारगृहे, हॉटेल्स, हवाईसेवा, एटीएमस्चा समावेश असलेली रोख अग्रिम केंद्रे आणि मेल ऑर्डर जाहिरातदार (जसे की किरकोळ विक्रेते, वितरक किंवा उत्पादक) यांचा अंतर्भाव आहे.
- **“व्यापारी”** (मर्चंट) म्हणजे व्यापार प्रतिष्ठानाची मालकी असलेली वा त्याचे व्यवस्थापन किंवा संचालन करणारी कुठलीही व्यक्ती, तिचे उत्तराधिकारी आणि परवानगीकृत नेमणूकदार (असायनीज्).
- **“किमान देय रक्कम”** किंवा **“एमएडी”** याचा अर्थ विवरण-पत्रात नमूद केल्याप्रमाणे रक्कम.
- **“एकूण देय रक्कम”** किंवा **“टीएडी”** याचा अर्थ विवरण-पत्रात नमूद केल्याप्रमाणे रक्कम.
- **“भरणा देय तारीख”** याचा अर्थ प्रत्येक महिन्याची तारीख, ज्या दिवशी कार्डधारकाद्वारे कार्ड उपयोगाच्या शुल्काचा, विवरण-पत्राद्वारे संप्रेषित भरणा देय असतो.
- **“प्राथमिक कार्डधारक”** (प्रायमरी कार्ड होल्डर) अशी व्यक्ती आहे. जिच्या नावे कार्डखाते उघडण्यात आले आहे आणि ज्या व्यक्तीला कार्ड जारी करण्यात आलेले आहे.
- **“आरबीआय”** म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.
- **“विवरणपत्र”** याचा अर्थ मासिक लेखा विवरणपत्र/विवरणपत्रे जी आयसीआयसीआय बँकेतर्फे कार्डधारकाला त्याच्या त्या दिवसाच्या आर्थिक दायित्वाचे निर्धारण करून पाठविण्यात येते/प्राथमिक कार्डधारक आणि कुठलाही अनूपूरक कार्डधारकातर्फे आयसीआयसीआय बँकेला कार्डखात्याबाबत सादर.

- **''अनूपूरक कार्डधारक''** (सप्लिमेंट्री कार्ड होल्डर) याचा अर्थ प्राथमिक कार्डधारकाच्या परिवारातील सदस्य जो प्राथमिक कार्डधारकाच्या नातेसंबंधाच्या अन्वये कार्डधारक होतो.

- **''प्रशुल्क जोडपत्र''** (टॅरीप अॅनेक्शर) याचा अर्थ कार्डावर देण्यात येणाऱ्या सुविधांसाठी लागू असलेल्या शुल्काच्या आकारणीचा तपशील देणारे जोडपत्र. हे शुल्क आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छाधिकाराच्या बदलांच्या अधीन असतात. तरीसुद्धा अशा शुल्कांमधील बदल हे भावी परिणामाने केवळ 1 महिन्याची पूर्वसूचना कार्डधारकाला देऊन केले जातात.

- **''व्यवहार निर्देशन''** याचा अर्थ कार्डधारकाद्वारे व्यवहार प्रभावित करण्यासाठी प्रत्यक्षरीत्या वा अप्रत्यक्षरीत्या आयसीआयसीआय बँकेला दिले जाणारे निर्देशन आणि/अथवा आयसीआयसीआय बँकेच्या. 24–तास ग्राहक सेवा केंद्राच्या माध्यमातून दिले जाणारे आणि/अथवा इन्फिनिटीच्या माध्यमातून दिले जाणारे. व्यवहार निर्देशनामध्ये शुल्क पावती, रोख अग्रिम पावती किंवा मेल ऑर्डर कूपन यांचा समावेश असेल पण ते तेवढ्यापुरते मर्यादित नसेल.

- या शर्ती आणि अटी म्हणजे इथे योजलेल्या शर्ती आणि अटी आणि/अथवा आयसीआयसीआय बँकतर्फे वेळोवेळी संशोधित व करारनिविष्ट होऊ शकणाऱ्या.

या शर्ती आणि अटींमध्ये, जोपर्यंत विरुद्ध हेतू दिसून येत नाही :

(a) च्याकडे निर्देश/संदर्भित :

**''संशोधन''** मध्ये पुरवणी, फेरबदल, नूतनीकरण, बदल किंवा पुनर्अधिनियम यांचा समावेश आहे आणि ''संशोधिर्त''चा अन्वयार्थ तदनुसार होईल;

**''प्राधिकार''** किंवा **''मान्यता''** यामध्ये अंतर्भूत आहेत : प्राधिकार, , संमती, मंजुरी, मान्यता, परवानगी, ठराव, परवाना, सूट, फायलिंग आणि नोंदणी;

**''कायदा''** यामध्ये समाविष्ट आहे कुठलीही घटना, परिनियम, कायदा, नियम, नियमबद्धता, अध्यादेश, निकाल, हुकुम, हुकुमनामा, प्राधिकार किंवा इतर प्रकाशित निर्देश, मार्गदर्शक तत्व, गरज किंवा कायद्याचे बळ असलेले शासकीय निर्बंध, वेळोवेळी संशोधित व विनंती अर्जाचे स्वाक्षरीकरण/सादरीकरणाच्या तारखेपर्यंत किंवा त्यानंतरच्या प्रभावातील न्याय प्राधिकाराद्वारे कुठलेही निश्चायकत्व, किंवा पूर्वगामी.

(b) एकवचनांमध्ये बहुवचनांचा समावेश आहे (आणि त्याचप्रमाणे उलट);

(c) या शर्ती आणि अटींमधील शीर्षके केवळ संदर्भाच्या सोयीसाठी समाविष्ट करण्यात आली आहेत आणि शर्ती आणि अटींचा अन्वयार्थ लावताना आणि अर्थउकल करताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात यावे;

(d) ''समावष्टि'' किंवा ''समावेश'' चा अन्वयार्थ सीमित नसेल.

(e) लिंगासंदर्भातील निर्देशात स्त्री, पुरुष आणि नपुंसक लिंग या दिशेने संदर्भाचा समावेश असेल;

(f) आयसीआयसीआय बँकेला कुठल्याही बाबतीत आवश्यक असलेल्या सर्व मान्यता, परवानगी, संमती किंवा स्वीकृती यासाठी आयसीआयसीआय बँकेची पूर्व लेखी मान्यता, परवानगी, संमती किंवा स्वीकृती आवश्यक राहील;

(g) व्हिसा/मास्टर कार्ड नियमबद्धतेचे संदर्भ हे व्हिसा/मास्टर कार्डतर्पे त्यांच्याशी संबंधित नेटवर्कमधील सर्व सदस्य बँकांना जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांशी संबंधित आहेत.

(h) अशा प्रसंगात जेथे आयसीआयसीआय बँक आणि कार्डधारक यामध्ये कुठलीही असहमती किंवा वाद हा कुठल्याही प्रकरणाच्या वास्तविकतेसाठी आहे, ज्यामध्ये कुठलाही प्रसंग, घटना, परिस्थिती, बदल, तथ्य, माहिती, कागदपत्रे, प्राधिकार, कार्यवाही, कायदा, लोपन, दावे, भंग कसूर किंवा इतरही समाविष्ट आहेत, तेथे पूर्वगामी नमूद बाबींच्या वास्तविकेबाबत आयसीआयसीआय

बँकेचे मत अंतिम आणि कार्डधारकावर बंधनकारक असेल.

(i) ''आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्ड करार'' या शब्दांचा कार्डवरील किंवा इतरत्र करण्यात आलेला प्रयोग याचा अर्थ या शर्ती आणि अटी.

## II. कार्ड सुविधा

कार्ड हे आयसीआयसीआय बँकेची मालमत्ता आहे. आयसीआयसीआय बँक यासाठी अधिकार राखून ठेवते: (1) पत केंद्राचा अहवाल आणि इतर अनुमानित अहवाल यांच्या साहाय्याने अर्जदाराचे पत-पात्रता निर्धारण आणि (2) आपल्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात कुठल्याही अर्जदाराला कार्ड जारी करण्यास नकार देणे. कार्ड अहस्तांतरणीय असून त्यांचा उपयोग इथे नमूद केलेल्या आणि आयसीआयसीआय बँकेतर्फे वेळोवेळी करारनिविष्ट केल्या जाणाऱ्या इतर अतिरिक्त अटींच्या अधीन असेल. कार्ड प्राप्त झाल्यावर कार्डधारक त्या कार्डामागे लगेच स्वाक्षरी करेल. आयसीआयसीआय बँक 24-तास ग्राहक सेवा केंद्र आणि /अथवा इन्फिनिटी सर्व कार्डधारकांसाठी उपलब्ध असेल. आयसीआयसीआय बँक 24-तास ग्राहक सुविधा केंद्र आणि/अथवा इन्फिनिटी यांच्या माध्यमातून कार्डधारक जी कुठलीही सेवा /सुविधा प्राप्त करीत आहे, ज्यामध्ये पत मर्यादितील वाढ, व्यवहारांची चौकशी, एकूण देय रक्कम, विवरण पत्रांची तपशील, भरणा देय तारीख इत्यादींचा समावेश आहे, मात्र ज्या तेवढ्यापुरत्या मर्यादित नाहीत, त्यासाठी कार्डधारक हा सेवा/सुविधा संदर्भातील आणि अशा सुविधा/सेवा प्राप्त करून घेण्याच्या वेळोवेळी संशोधित पद्धतीबाबत आयसीआयसीआय बँकेतर्फे करारनिविष्ट अटींसाठी बांधील राहील.

## III. कार्डाचा उपयोग

(a) आंतरराष्ट्रीय वैध कार्डांबाबतीत, असे कार्ड कलम खखखख (स) मध्ये दिल्याप्रमाणे वगळता, सर्व जगभर वैध राहील. इतर कार्डाच्या बाबतीत, त्यांचा उपयोग फक्त अशा व्यापारी आस्थापनांसाठी मर्यादित राहील, ज्या व्हिसा, व्हिसा इलेक्ट्रॉन क्रेडिट कार्डस् /मास्टर कार्ड/एएमईक्स भारतात स्वीकारतात. तथापि, आयसीआयसीआय बँक आणि संबधित व्यापारी अस्थापना, कोणत्याही वेळी अशा व्यापारी आस्थापनांमध्ये कोणत्याही कारणांसाठी, क्रेडिट कार्डाच्या उपयोगासाठी नकार देऊ शकतात. क्रेडिट कार्ड प्रामाणिकपणे व्यक्तीगत किंवा कार्यालयीन हेतुंसाठी उपयोगात आणले जाऊ शकते आणि कार्डधारकाद्वारे त्याचा उपयोग अयोग्य लाभासाठी करण्याकरिता परवानगी दिली जाणार नाही. जर व्यापारी आस्थापनाने खरेदी करण्यासाठी किंवा इतर सुविधांसाठी काही शुल्क लावले तर कार्डधारकाने अशा शुल्कावर संबंधित व्यापारी आस्थापनासोबत त्याबाबत तडजोड करून घ्यावी, आणि आयसीआयसीआय बँक त्यासाठी कुठल्याही प्रकारे उत्तरदायी मानली जाणार नाही. व्यापारी आस्थापनांमध्ये कार्ड उपयोगात आणल्यानंतर कार्डधारकाने शुल्क पावतीवर सही करण्यासाठी जबाबदार राहील, जर कार्डधारकाने शुल्क पावतीवर सही केली नाही, तर कार्डधारक अशा व्यवहारांसाठी/ अशा सर्व संबंधित शुल्कांसाठी उत्तरदायी राहील. आयसीआयसीआय बँक शुल्क पावतीच्या प्रती कार्डधारकास देणार नाही. मात्र कार्डधारकाने याबाबत संबंधित व्यवहार झाल्यापासून 45 दिवसाच्या आत जर विनंती केली तर आयसीआयसीआय बँक आपल्या पूर्व स्वविवेकाने, प्रशुल्क जोडपत्रात दिल्याप्रमाणे शुल्क घेऊन शुल्क पावती कार्डधारकाला मेल ऑर्डर करण्यासाठी किंवा टेलीफोन ऑर्डर खरेदीसाठी संमती देऊ शकते. मात्र ऑनलाईन क्रेडिट कार्डाचा उपयोग हा ऑनलाईन व्यवहार/मेल ऑर्डर्स पुरताच मर्यादित राहील. ऑनलाईन क्रेडिट कार्ड फक्त सप्लीमेंट्री कार्ड/ॲड-ऑन कार्ड म्हणून, प्राथमिक कार्ड नव्हे, किंवा आयसीआयसीआय बँकेने आपल्या स्वविवेकाने वेळोवेळी सूचित केल्याप्रमाणे प्रदान करण्यात येईल. कार्डधारकाला या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे की मेलऑर्डर किंवा टेलिफोन ऑर्डरद्वारा खरेदीच्या बाबतीत, अशा खरेदीच्या वेळी शुल्क पावत्या त्याचेकडून स्वाक्षरीकृत करण्यात येणार नाही. यानुसार, कार्डधारक हे स्वीकारीत आहे की, जरी अशा खरेदीसाठी किंवा शुल्कासाठी त्याच्या सत्यतेबाबत किंवा वैधतेविषयी वाद निर्माण झाला तरी मग तो कोणत्याही कारणास्तव असेना, कार्डधारक अशा सर्व देय रकमांचा आयसीआयसीआय बँकेला भरणा करेल.

(b) सर्व प्रकारचे वाद हे दोघांमधील असतील आणि कार्डधारकास संबंधित व्यापारी आस्थापनेसोबत ते सोडवावे लागतील. आयसीआयसीआय बँक त्यासाठी कुठल्याही प्रकारे उत्तरदायी असणार नाही.

(c) कार्डाचा उपयोग यासाठी केल्या जाऊ शकेल : 1) आयसीआयसीआय बँकेने कार्डधारकाला सूचित केल्या प्रमाणे क्रेडिट मर्यादेअंतर्गत आणि 2) त्यावर उमटरेखित (एम्बॉस) केलेल्या महिन्याच्या अखेरच्या दिवसापूर्वी.

(d) कार्डाचा उपयोग करण्याचा अधिकार ताबडतोब संपुष्टात येईल : कलम त खाली दिल्याप्रमाणे 1) त्याची सदस्यता खारीज केल्यामुळे, किंवा 2) कार्ड गहाळ झाल्यामुळे /कार्डाचा दुरुपयोग केल्यामुळे किंवा कार्डाची चोरी झाल्यामुळे.

(e) कार्डाचा उपयोग केल्यामुळे हे समजल्या जाईल की कार्डधारकाने स्थायी रूपाने असे निवेदन केले आहे की कार्ड अवधीचे नविनीकरण आणि /अथवा कार्डाच्या जागी दुसरे कार्ड प्रत्येक कार्डधारकाला प्रदान करण्यात येईल, जोपर्यंत कार्डधारक 24 तास कार्यरत आयसीआयसीआय बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राला/इन्फिनिटीला अन्य पद्धतीने सूचित करीत नाही तोपर्यंत, आणि अशा वेळी हे नूतनीकरण आणि/अथवा दुसरे कार्ड देणे हे आयसीआयसीआय बँकेच्या स्वविकावर संपूर्णत: अधीन असेल.

(f) कार्डधारकाने कार्डामधील व्यवहाराच्या आयसीआयसीआय बँकेच्या संदर्भात प्रत्येक वेळी चांगल्या भावनेने वागले पाहिजे.

(g) कार्डधारकाला जारी करण्यात आलेले हे आंतराष्ट्रीय वैध कार्ड संपूर्ण जगभर विधिग्राह्य आहे, केवळ नेपाळ आणि भुतान येथील परकीय चलन व्यापारी (मर्चंट) आस्थापनेत भरणा वगळून. या कार्डाच्या संदर्भात, त्याचा उपयोग फक्त भारत/नेपाळ/भूतानमध्येच केला पाहिजे, भारत/नेपाळ/भूतान व्यतिरिक्त याचा उपयोग परकीय चलन प्रबंधक नियम (एफईएमए) किंवा तत्सम कोणत्याही कायद्याच्या नियमांचे उल्लंघन ठरेल. कार्डधारक या शर्तीअधीन चुकीच्या उपयोगाकरिता जबाबदारी मानला जाईल आणि प्रावधानाच्या विरुद्ध आचरणाबद्दल, हे अभिवचन आणि संमती देतो की आयसीआयसीआय बँकेला होणाऱ्या कोणतेही नुकसान, हानी, व्याज, परिवर्तन किंवा कोणतीही आर्थिक भुर्दंड जो आयसीआयसीआय बँकेला वहन करावा लागू शकतो, त्याची क्षतिपूर्ती करण्याचे तो मान्य करतो.

(h) आंतराष्ट्रीय वैध कार्ड कोणत्याही हेतूसाठी इंटरनेटवर वापरल्या जाऊ शकते, ज्यासाठी भारतातील अधिकृत विक्रेत्याकडून चलन खरेदी केल्या जाऊ शकेल.

(i) आंतराष्ट्रीय वैध कार्ड आणि सर्वप्रकारची कार्डे ही प्रतिबंधित वस्तू जसे लॉटरी तिकीटा, बंदी घातलेली मासिके, स्वीपस्टेक्समध्ये भाग घेणे किंवा कॉलबॅक सेवेसाठी केला जाणारा भरणा यासाठी इंटरनेटवर किंवा इतर प्रकारे वापरता येणार नाहीत.

(j) अधिकृत विक्रेते भारताबाहेर करण्यात येणाऱ्या निर्यातीसाठी क्रेडिट कार्डच्या अंतर्गत नावें खर्ची घलण्यासाठी (डेबीट) भरणा स्वीकारू शकतात. जरी आयातक अशील हा भारताला भेट देणारा असला किंवा नसला तरीही. त्यामुळे अधिकृत विक्रेते हे भारताबाहेर केल्या गेलेल्या निर्यातीसाठी आयातकाच्या क्रेडिट कार्डवर नावें खर्ची घालून भरणा स्वीकारू शकतात, जेथे अशा प्रकारे करण्यात आलेला पुनर्भरणा कार्ड जारी करणाऱ्या बँका/संस्था परकीय चलनात प्राप्त करू शकतात.

(k) के. कोणतेही कारण न देता कार्डावर केलेली ऑथरायझेशनची विनंती कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचे किंवा न स्वीकारण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य आणि अधिकार आयसीआयसीआय बँक स्वत:कडे राखून ठेवत आहे. काही प्रकरणांमध्ये, केवळ स्वत:च्या अधिकारावर, आयसीआयसीआय बँक कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केयर केंद्राशी संपर्क साधण्यास सांगून व्यवहार संमत करून त्याची नोंद कार्ड खात्यात करण्यापूर्वी त्यावर शिक्कामोर्तब करेल.

(l) कार्डधारक यास संमती देतो की तो या कार्डाचा कोणत्याही अवैध/ कायद्याने मनाई केलेल्या खरेदीसाठी/हेतूकरिता भरणा करण्यासाठी उपयोग करणार नाही.

**IV. व्यक्तीगत ओळख क्रमांक :**

कार्डधारकाला हे कार्ड वापरता यावे यासाठी त्याला सर्व प्रथम एक व्यक्तीगत ओळक क्रमांक (एपीआयएन) देण्यात येईल. हा क्रमांक त्याला डाकेने (पोस्टाने) पाठविला जाईल आणि तो मोहोरबंद लिफाफ्यात न मिळाल्यास, कार्डधारक आयसीआयसीआय बँक शाखेला किंवा आयसीआयसीआय बँक 24 तास ग्राहक सेवा केंद्राला संपर्क साधेल. हा क्रमांक, कार्डधारकाला आपल्या जोखमीवर एटीएम किंवा आयसीआयसीआय बँकेच्या शाखेत किंवा आयसीआयसीआय बँक 24 तास ग्राहक सेवा केंद्रात बदलवता येईल. या क्रमांकामुळे त्याला आपले खाते प्रवेशनासाठी तो वापरता येईल पण कार्डधारक त्याचा उपयोग, गोपनीयता आणि या क्र

मांकाचे संरक्षण यासाठी तसेच हा क्रमांक वापरून सर्व प्रकारच्या सूचनांमध्ये आपल्या कार्डखात्यात अशा एपीएनच्या उपयोगाने सूचनाबदल नोंदविण्यासाठी उत्तरदायी राहील. कार्डधारक आपला एपीआयएन क्रमांक कोणत्याही स्वरूपात अन्यत्र लिहून ठेवणार नाही ज्यामुळे त्रयस्थ पक्षांना एपीआयएन माहीत होणे सुलभ होईल. कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेला पीआयएननुसार व्यवहार करण्यास आणि सूचना देण्यास्तव अधिकृत केलेले आहे, हे अधिकृतीकरण तो परत घेणार नाही. आयसीआयसीआय बँक ही फक्त कार्डधारकाच्या एपीआयएन सत्यापन व्यतिरिक्त केला जाणारा व्यवहार किंवा दिल्या गेलेल्या सूचना यांच्या अधिकृतेबद्दल सत्यापन करण्यास बाध्य नाही. तसेच कार्डधारक प्रत्येक वेळी दिलेल्या सूचनांसह, एपीआयएनच्या सुरक्षिततेविषयी सर्व आवश्यक ती खबरदारी घेईल. जर कार्डधारकाने असे केले नाहीत, तर तो आयसीआयसीआय बँकेला होणाऱ्या नुकासानाकरिता उत्तरदायी ठरेल. आयसीआयसीआय बँक स्वत:च्या विवेकाने विद्यमान कार्डवर नवीन एपीआयएन क्रमांक देऊ शकते. इथे नमूद आणि वेळोवेळी आयसीआयसीआय बँकेने निर्दिष्ट केलेल्या तरतुदींच्या अधीन, कार्डधारक हा आयसीआयसीआय बँकेला आणि/अथवा एपीएनला कुठल्याही अयोग्य/लबाडीच्या/अनधिकृत/दुबार/त्रुटीयुक्त उपयोगासाठी उत्तरदायी ठरविणार नाही कुठल्याही त्रयस्थ पक्षाच्या हाती कार्ड पडल्याने किंवा कुठल्याही त्रयस्थ पक्षाच्या एपीआयएन आल्याने, त्रयस्थ पक्षाद्वारे होणाऱ्या कार्डाचा वापर/गैरवापराशी संबंधित कुठल्याही परिणामांसाठी आयसीआयसीआय बँक उत्तरदायी राहणार नाही. जर कुठल्या त्रयस्थ पक्षांनी सेवेसाठी, ज्यामध्ये कार्ड खात्यांचा अंतर्भाव आहे, शिरकाव मिळविला तर कार्डधारक जबाबदार राहील आणि त्रयस्थ पक्षांतर्फे अशा शिरकाव व उपयोगावर आधारित किंवा त्याचेशी संबंधित गैरवापर/वापर किंवा याशिवाय इतरही कशातून निर्माण होणाऱ्या कुठल्याही दायित्व, खर्च किंवा नुकसान यांची क्षतिपूर्ती तो आयसीआयसीआय बँकेला करेल.

## V. भंग आणि समाप्ती/परत घेणे

(a) **भंग :** कुठल्याही कार्डधारकाद्वारे यापैकी कुठल्याही शर्ती आणि अटींचा भींग होण्याच्या प्रसंगात :

(i) या शर्ती आणि अटींची इतर तरतूद असूनही अशा भंगातून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उद्‌भवणाऱ्या कुठल्याही हानीसाठी कार्डधारक उत्तरदायी असेल आणि; (ii) कार्डधारक आयसीआयसीआय बँकेला, मागणी उपरांत, कार्डधारकाकडील सर्व अदत्त (शिल्लक) रक्कम आयसीआयसीआय बँकेला अदा करण्यासाठी उत्तरदायी असेल, जरी ती रक्कम अशा मागणीच्या तारखेला आयसीआयसीआय बँकेला नियत व देय असेल अथवा नसेल.

## (b) समाप्ती /परत घेणे :

कोणत्याही क्षणी कार्डधारक, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, आयसीआयसीआय बँक फोन बँकिंग सेंटर, पी. ओ. बॉक्स नंबर २0, बंजारा हिल्स, पी. ओ. हैदराबाद 500 034, भारत या पत्त्यावर लेखी नोटीस देऊन आपले कार्ड रद्द करण्याची विनंती करू शकतो/ शकते.

ही पूर्वोक्त सूचना तो पर्यंत अमलात येत नाही जोवर, कार्डाच्या वरील उजव्या बाजूचा कोपरा फाडून ते विरूपित केले जात नाही आणि होलोग्राम आणि चुंबकीय तालिका या दोन्ही कापल्याची खातरजमा होत नाही (ऑनलाईन क्रेडिट कार्डबाबत अपवाद) आणि आयसीआयसीआय बँकेला जोपर्यंत ते प्राप्त होत नाही. उपरनिर्दिष्ट संरक्षित केल्यानुसारच, कार्ड खाते आणि कार्ड समाप्त केले जाऊ शकतात, इतर प्रकारे नाही.

(i) अशा प्रसंगात, जेथे कार्डधारकाने कार्ड नष्ट केल्याचा दावा केल्यानंतर, कार्डावरील शुल्क वहन केले जाते, परंतु आयसीआयसीआय बँकेला कार्ड प्राप्त झालेले नाही, तेथे कार्डावरील शुल्कआकारणीसाठी कार्डधारक संपूर्णत: उत्तरदायी राहील, जरी असा प्रसंग गैरवापरामुळे उद्‌भवलेला असेल अथवा नसेल आणि आयसीआयसीआय बँकेला कार्ड नष्ट केल्याचे सूचित करण्यात आलेले असेल अथवा नसेल.

(ii) कार्डखात्याच्या समाप्तीनंतर आणि आयसीआयसीआय बँक आणि कार्डधारकात पूर्वीचा कुठलाही करार असूनही उलटपक्षी: (अ) तेव्हाच्या सर्व अदत्त शुल्कांची एकूण राशी जी विवरणपत्रात प्रतिबिंबित असेल वा नसेल आणि (इ) समाप्तीनंतर वहन झालेल्या कुठल्याही ऐच्छिक शुल्कांची रक्कम (संबंधित व्यवहार निर्देशनाच्या तारखेपासूनच्या प्रभावाने) कार्डधारकाद्वारे देय आणि भरणायोग्य होईल आणि अशा शुल्कांचे वहन झाल्या तारखेपासून त्यावर वेळोवेळी लागू असलेले व्याज उपायोजित होत जाईल.

(iii) आयसीआयसीआय बँक कधीही, आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण मर्जीने परिस्थितीच्या गरजेनुसार कार्ड खाते आणि कार्ड, सूचना देऊन किंवा न देता खंडित करु शकते. कार्ड सभासद स्पष्टपणे मान्य करतो आणि स्वीकारतो की या अटी आणि शर्तींनुसार चालविण्यात येणारी दोन किंवा अधिक कार्ड खाती आयसीआयसीआय बँककडे कार्ड सभासदाची असल्यास आणि त्यापैकी एखाद्या खात्यात आयसीआयसीआय बँकेला देय रकमेचा भरणा करण्यात कसूर केल्यास, आयसीआयसीआय बँकेच्या इतर सर्व कार्ड खात्यांमध्ये कार्ड सभासदाला उपलब्ध केलेली पत मर्यादा रोखण्याचा तसेच अशा सर्व कार्ड खात्यांमध्ये उपलब्ध असलेले सर्व हक्क/लाभ मागे घेण्याचा अधिकार कसूर केलेले कार्ड खाते कार्ड सभासदाने नियमित करेपर्यंत आयसीआयसीआय बँकेला आहे. कार्ड सभासद हेही मान्य करतो आणि जाणतो की वरील गोष्टीसाठी कोणतीही अतिरिक्त सूचना आयसीआयसीआय बँकेने देण्याची गरज नसेल.

(iv) आयसीआयसीआय बँक ही कुठलीही सूचना न देता किंवा त्यासाठी कारण नमूद न करता, कार्डवरील विशेषाधिकार कुठल्याही वेळेस परत घेण्याचा आणि अथवा कार्ड रद्द करण्याचा तात्पुरता किंवा कायमस्वरूपी अधिकार आपल्या संपूर्ण स्वेच्छाधीनतेने राखून ठेवते. कार्ड तात्पुरते परत घेण्याच्या प्रकरणांमध्ये आयसीआयसीआय बँक आपल्या संपूर्ण स्वेच्छाधिकाराने विशेषाधिकार पुन:स्थापित करू शकते. कार्ड कायमस्वरूपी परत घेण्याच्या प्रकरणांत, कार्डधारकाला स्थायीरुपात सदस्यत्व नाकारण्याचा अधिकार आयसीआयसीआय बँकेला आहे. तरीसुद्धा, हे येथे काटेकोरपणे स्पष्ट करण्यात येते की कार्ड परत घेण्यामध्ये (तात्पुरते किंवा कायमस्वरूपी) कार्डाशी संबंधित सर्व आनुषंगिक फायदे, विशेषाधिकार आणि कार्डाशी जुळलेल्या सर्व सेवा आपोआप परत घेणे अंतर्भूत आहे.

कार्ड तात्पुरते वा कायमस्वरूपी परत घेण्याच्या अशा प्रसंगात, कार्ड परत घेण्यापूर्वी कार्डवरील सर्व शुल्कआकारणींसाठी कार्डधारकाचे उत्तरदायित्व त्यावरील इतर सर्व प्रयोज्य शुल्कांसह संपूर्णत: कायम राहील. आयसीआयसीआय बँकेने एरवी तसे निर्दिष्ट केले नसले तरीही.

कार्डवर उमटरेखीत (एम्बॉस) केलेल्या वैधता कालावधीच्या संदर्भाशिवाय, कार्ड कुठल्याही वेळेला परत घेतले जाऊ शकते आणि कार्ड खाते कोणत्याही वेळी बंद करण्यात येऊ शकते. कार्डधारक हा आयसीआयसीआय बँक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी कार्ड स्वाधीन करण्याची विनंती केल्यावर, कार्ड परत करण्याचे मान्य करतो. कार्डाचे विशेषाधिकार परत घेण्याची सूचना दिल्यानंतर कार्डाचा उपयोग करणे हे लबाडीचे कृत्य असून ते कार्डधारकाला कायदेशीर कार्यवाहीच्या अधीन करते.

## VI. शुल्क (चार्जेस) आणि भरणा

शुल्कामध्ये खालीलपैकी प्रत्येक बाब समाविष्ट आहे.प्रट्र

(A). ऐच्छिक शुल्कआकारणीमध्ये समाविष्ट असेल :

- मालाच्या कुठल्याही खरेदीची रक्कम आणि/अथवा व्यवहार निर्देशन सेवा;
- व्यवहार निर्देशनाला अनुरूप प्रदान करण्यात आलेली कुठलीही रोख अग्रिम रक्कम;
- कुठलीही रक्कम, जी कार्डधारक आयसीआयसीआय बँकेला व्यवहार निर्देशाद्वारे कार्ड खात्यातून खर्ची घालण्यास सांगतो.

(B). अनैच्छिक शुल्कआकारणीमध्ये यांचा समावेश राहील:

- आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड खाते किंवा कार्ड संबंधात आकारले जाणारे कुठलेही शुल्क ज्यामध्ये सदस्यत्व, वार्षिक, बदल, नूतनीकरण, हाताळणी, विलंब शुल्क आणि इतर शुल्क यांचा अंतर्भाव आहे.
- सदस्यत्व/वार्षिक शुल्क हे आयसीआयसीआय बँकेच्या प्रचलित दराने कार्ड खात्यातून नावें खर्ची घातले जाईल. हे शुल्क ना परतावा स्वरूपाचे राहील.
- सदस्यत्व नूतनीकरणाचे वार्षिक शुल्क हे कार्डधारकाद्वारे कार्डाच्या पहिल्या वर्धापनदिनाला देय असले.
- आयसीआयसीआय बँकेतर्फे वेळोवेळी निश्चित करण्यात येणारी सेवा शुल्कआकारणी विनिर्दिष्ट प्रकारच्या व्यवहारासाठी

लावण्यात येऊ शकते. अनैच्छिक शुल्क आकारणीच्या संगणणेची पद्धत ही आयसीआयसीआय बँकेद्वारे वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे असेल.

(C) आयसीआयसीआय बँकेचा कुठल्याही शुल्क रकमेचा इथे उपरनिर्दिष्ट रेकॉर्ड, त्रुटी प्रकटनाअभावी, कार्डधारकावर अंतिम स्वरूपाचा आणि बंधनकारक असेल आणि कुठल्याही अशा प्रकरणात निर्णायक असेल जेथे आयसीआयसीआय बँकेने ऐच्छिक शुल्काच्या अनुरूप कुठलाही भरणा संस्कारित केला आहे.

सर्व सांवधिक कर, सेवा कर, इतर सर्व आयात कर, शुल्क (ज्यामध्ये मुद्रांक शुल्क आणि कार्ड संदर्भातील काही नोंदणी शुल्क असल्यास त्याचा समावेशासह) आणि कर (ज्या कुठल्याही प्रकारचे) जे सकराकद्वारे किंवा इतर प्राधिकर्त्यांतर्फे कार्डाबाबत किंवा कार्डसंबंधाने वेळोवेळी लावले जाऊ शकतात.

(D) विलीब आकारणी किंवा सीशोधित आकारणी

(a) व्यापारी (मर्चंट) यांना जर कार्डधारकाने हॉटेल, कार भाडे कंपनी किंवा समुद्रसंचार व्यवहार किंवा इतर कुठल्याही व्यवहारासाठी विलंब आकारणी किंवा संशोधित आकारणीकरिता उत्तरदायी होण्यासाठी संमती दिली तर ते विलंब आकारणी किंवा संशोधित आकारणीचे संस्करण करू शकतात.

(b) विलंब आकारणी किंवा संशोधित आकारणी ही कार्ड खात्यामध्ये संबंधित व्यवहाराच्या तारखेपासून 90 कॅलेंडर दिवसात प्रक्रियाकृत होईल.

(c) या व्यवहारात सर्वसाधारणपणे खोली (आवास), खाद्यपदार्थ किंवा पेयावरील खर्च, कर, इंधन, विमा, भाड्यापोटी देण्याचे शुल्क, भाड्याने दिलेल्या वाहनांना झालेले नुकसान, पार्किंक तिकीटा आणि इतर वाहतुकींच्या बाबतीत झालेली उल्लंघने, माल आणि समुद्रसंचार (क्रुझ लाईन) बोटींवर दिलेल्या सेवा यांचा समावेश राहील.

(E) परकीय चलनातील आकारणी

आंतरराष्ट्रीय वैध कार्डाच्या व्यतिरिक्त आयसीआयसीआय बँक, नेपाळ आणि भूतान प्रदेशाशिवाय ज्यांत परकीय चलनात कोणत्याही प्रकारच्या शुल्कावर खर्च केला गेला असेल, अशा व्यवहाराची दखल घेण्यास किंवा कोणत्याही अन्यप्रकारे बाध्य असणार नाही. वर दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने, आयसीआयसीआय बँकेकडून दिल्या गेलेले कोणतेही शुल्क हे कार्डधारकालाच वहन करावे लागेल आणि त्यामुळे कार्डधारकाची आयसीआयसीआय बँकेने एतद्वारा केलेल्या भरण्यापोटी कार्डधारकाची जबाबदारी संपली, असे समजले जाणार नाही. आयसीआयसीआय बँक ह्या बंधनापासून आणि कार्डधारकाने अशा प्रकारे केलेल्या भरण्यापासून पूर्णपणे अलिप्त राहील.ट्र

(F) रेल्वेज्सोबतचे व्यवहार

जेव्हा क्रेडिट कार्डवर तिकीट काढल्या जाईल, तेव्हा कार्डधारकाला तिकीटाच्या किमतीचे आणि इतर लागू असणाऱ्या अतिरिक्त आकारणींचा भरणा करावा लागेल. जर काही कारणाने तिकीट रद्द केल्या गेले तर ही रक्कम कार्डखात्यात जमा करण्यात येईल, (रद्द करण्याचे शुल्क कापून) जेव्हा–जेव्हा यासाठी आयसीआयसीआय बँकेला अशी रक्कम प्राप्त होईल. तथापि, कार्डधारकाद्वारे तिकीट रद्द करण्याच्या 150 दिवसांपूर्वी, शुल्कपावती आयसीआयसीआय बँकेला प्रेषित केल्यावर, यासंबंधी एक पत्र देऊन ज्यामध्ये तिकीट खरेदी करण्याची तारीख, रद्द करण्याची तारीख आणि तिकीट खरेदी करम्यासाठी दिलेली रक्कम नावें असल्याबाबतचे विवरणपत्र समाविष्ट असेल, ते दिल्यानंतर कार्डधारकाच्या कार्डखात्यात ही रक्कम वळती करण्यात येईल. यास देय असलेले व्यवहार शुल्क मात्र त्याला द्यावे लागेल.

(G) इंधन केंद्रावरील व्यवहार

इंधनासाठी कार्डधारकाने कार्डाचा वापर केला तर, दर परिपत्रकात उल्लेख केल्यानुसार त्यावर व्यवहार शुल्क लावले जाईल.

(H) क्रेडिट कार्डाचा उपयोग केल्यामुळे शुल्क लागू झाल्याक्षणी कार्डधारकाचे दायित्व सुरु होते. पेमेंट देय तारखेच्या दिवशी देय रक्कम भरलेली नसेल (मग ती बिलामध्ये आलेली असो वा नसो) तर अशा शिल्लक रकमेवर दर परिपत्रकात उल्लेख केल्यानुसार

शुल्क आकारले जाईल. शुल्क सरासरी दैनंदिन शिल्लक पद्धतीनुसार मोजले जाते आणि ते खालीलपैकी कोणत्याही एका तारखेला लावले जाते:

- हे शुल्क वस्तू वा सेवा खरेदी करण्याच्या संदर्भात असल्यास ते आयसीआयसीआय बँकेच्या रेकॉर्डमध्ये समाविष्ट झाल्याच्या तारखेपासून.
- हे शुल्क रोख रक्कम काढण्याच्या संदर्भात असल्यास ते काढल्याच्या ते काढल्याच्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेने पैसे दिल्याच्या रिसिटच्या तारखेपर्यंत.

(l) भरणा देय तारखेच्या दिवशी किंवा त्या पूर्वी, सर्व शुल्क त्वरीत प्रदान करण्याच्या कार्डधारकाच्या उत्तरदायित्वाबाबत कुठलाही पूर्वग्रह न बाळगता आणि विवरणपत्रात संप्रेषित केल्याप्रमाणे, कार्डधारक फक्त कमीत कमी देय एमएडी विवरणपत्रानुसारचे भुगतान देय तारखेच्या आधी करण्यासाठी आपला पर्याय निवडू शकतो. हा एमएडी एकूण देय रकमेच्या 5% किंवा अशी रक्कम जी आयसीआयसीआय बँक आपल्या स्वयंप्रेरणेने ठरवेल. जर पूर्वीच्या विवरणपत्रातील भरणा न केलेला एमएडी असेल तर तो सांप्रतच्या विवरणपत्रातील एमएडीला जोडला जाईल. जर अशी एकूण रक्कम पत मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्याचा एमएडी एकूण देय रकमेचा 5% किंवा ज्या राशीने त्याची रोख मर्यादा ओलांडील असेल, त्या दोहोंपैकी एक जी जास्त असेल एवढा राहील. अशा प्रकणातल जिथे फक्त एमएडीचेच भरणा झाला असेल तेथे एकूण देय रकमेच्या उर्वरीत राशीवर व्यवहाराच्या तारखेपासून व्याज आकारले जाईल. जिथे कार्डधारकाने फक्त एमएडीचेच भुगतान करण्याचा पर्याय निवडला असेल तेथे खालील अटी आणि शर्ती अतिरिक्त रूपाने लागू होतील :

a) विवरणपत्रक मिळाल्यानंतर, कार्डधारक एकूण देय रकमेचा भरणा आयसीआयसीआय बँकेला खालील कोणत्याही प्रकारे म्हणजे रोख स्वरूपात, धनादेशाने, ड्राफ्टने किंवा इन्फिनिटीच्या मार्फत किंवा भरणा सूचना देऊन करू शकेल. विवरणपत्रात दिल्या प्रमाणे किंवा सारखी राशी किंवा देय तारखेस देय असणाऱ्या एमएडी रकमेपेक्षा जी जास्त असले.

b) कार्डच्या उपयोगामुळे करण्यात आलेले खर्च खाली पोटनियम ह) (clause h) वरील विषद केल्याप्रमाणे यावर सेवा शुल्क लागेल.

c) जर एमएडीसाठी भरणा केला गेला असेल किंवा एकूण देय राशीपेक्षा कमी राशीचा भरणा केला असेल तर व्याज आणि सेवा शुल्क पूर्ण बकाया रकमेवर खरेदी करण्याच्या तारखेपासून आकारण्यात येईल आणि नवीन खरेदीसाठी जो काही खर्च नंतर केला जाईल, त्यावर वरील आकारणी देय भरणा तारखेपर्यंत आकारण्यात येईल. या शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त (वर दिल्याप्रमाणे), एमएडी देय भरणा तारखेनंतर राहिलेले, त्यावर विलंब शुल्क लागेल. कोणतेही एमएडी किंवा त्याचा भाग जो भरणा केला गेला असेल त्यावर देय भरणा तारखेनंतर व्याज द्यावे लागणार नाही.

* आयसीआयसीआय बँक आपल्या स्वविकाने, कोणत्याही वेळी, कोणतीही सूचना दे देता, आधी दिलेल्या तरतुदींप्रमाणे, कोणत्याही कार्डधारकाला फक्त एमएडीचा भरणा करण्याचा पर्याय परत घेऊ शकते.

आयसीआयसीआय बँकेने तशी मान्यता दिली नसल्यास, विशिष्ट स्टेटमेंटमध्ये दर्शवण्यात आलेल्या रकमेसाठीचे कार्डधारकाकडून आलेले कोणतेही पेमेंट खालील क्रमवारीनुसार त्या त्या देय रकमेपोटी कापून घेतले जातील:

1. सर्व कर, शुल्क, व्याज, किंमती, आकार, खर्च,

2. क्रेडिट कार्डावरील वैयक्तिक कर्जापोटी केलेले पेमेंट आणि बॅलन्स ट्रान्सफर सुविधेवर देय असलेला हफ्ता,
3. रोख काढल्यापोटी आणि फोनवर ड्राफ्ट सुविधेपोटी केलेले पेमेंट,
4. किरकोळ खरेदीवरील (जिथे किरकोळ खरेदीसाठीच्या पेमेंटचे रुपांतर हप्त्यांमध्ये करण्यात आलेले आहे) हप्त्याचे पेमेंट,
5. किरकोळ खरेदीसाठीचे पेमेंट,
6. काडलधारकाने जर घेतली असेल तर त्या घेतलेल्या बॅलन्स ट्रान्सफर सुविधेअंतर्गत इतर विविध गोष्टींसाठी केलेले पेमेंट.

येथे नमूद केलेल्याकोणत्याही गोष्टींचा संबंध बाजूला ठेवून :1. आयसीआयसीआय बँक, स्वत:च्या अधिकारात देय रकमेपोटी भरलेले पेमेंट, कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेकडून इतर संबंधित कागदपत्रांच्या वा इतर कसल्याही आधारे घेतलेल्या सुविधेपोटी देय असल्यास त्यासाठी कापून घेऊ शकते. 2. कोणत्या क्रमाने पेमेंट कापून घ्यायचे हे ठरवण्याचा हक्क आयसीआयसीआय बँकेकडे असेल.

अशी रक्कम कापून घेतल्यानंतर, उरलेली रक्कम, आयसीआयसीआय बँके तयार करणार असलेल्या ताबडतोबच्या पुढच्या स्टेटमेंटमध्ये नोंद केलेल्या रकमेपोटी कापून घेतली जाईल.

आयसीआयसीआय बँक कार्डधारकाला एक पत–मर्यादा देईल, जिचे कोणतेही वेळी उल्लंघन होऊ देता कामा नये. तथापि, एकूण बकाया राशी अशा पत–मर्यादेच्यावर गेली तर अशा जास्तीच्या रकमेवर अतिरिक्त शुल्क घेण्यात येईल. कार्डधारक, सदस्यतेची 12 महिने पूर्ण झाल्यानंतर अशा पतमर्यादेचा आढावा/वाढ/पत–मर्यादेत कपात आदींसाठी अर्ज करू शकतो. अशा आढाव्यानंतर केल्या जाणारे फेरफार, जर काही असतील तर ते आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छेवर व विवेकावर अवलंबून असतील. आयसीआयसीआय बँकेला असा आढावा घेण्याचा (पतमर्यादेत वाढ/कपात) अधिकार असून जर पत मर्यादेत वाढ करावयाची असेल तर कार्डधारकाच्या संमतीने आयसीआयसीआय बँक ती अमलात आणू शकेल.

टीप : जर एकूण देय रकमेचा भरणा, देय तारखेच्या आत किंवा तारखेला आयसीआयसीआय बँकेला मिळाला असेल, तर त्यावर सेवा शुल्क लागणार नाही. तथापि, सर्व रोखीच्या व्यवहाराबद्दल आणि ड्राफ्टसाठी, त्या तारखेला लागू असलेल्या दराप्रमाणे, अशा व्यवहाराच्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेला भरणा मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी सेवा शुल्क लागू होईल.

(J) आयसीआयसीआय बँकेला कार्डधारकाने त्याच्या क्रेडिट कार्डच्या भरण्याविषयी दिलेल्या सूचना पालन करण्याचा अधिकार असून, जसे त्याच्या कार्डखात्यात जमा दाखविले किंवा यासारख्या राशी नामें दाखविणे किंवा दुसऱ्या खात्यावर करणे, ज्या कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेसबोत ठरविल्या असतील, मात्र बँकेला त्यासाठी बाध्य केले जाऊ शकणार नाही. कार्डखात्यावरील संपूर्ण अदत्त बाकी आणि कार्ड व्यवहाराच्या इतर रकमांसह केलेले व्यवहार मात्र कार्डखात्यात वळते न केलेल, हे सर्व कार्डधारक, त्याचे उत्तराधिकारी, नामजद व्यक्ती आणि कायद्याने ठरविले गेलेले वारसदार, कार्डधारकाच्या मृत्युमूळे (* क्रेडिट शील्ड बेनीफीटच्या समायोजनानंतर), दिवाळखोरीमुळे किंवा कार्डधारकाने आपला व्यापार बंद केल्यामुळे त्वरित आयसीआयसीआय बँकेला देय होतील.

* क्रेडिट शील्ड बेनीफीटकरिता प्रशुल्क जोडपत्र बघावे.

(K) कार्डधारक स्पष्टपणे हे स्वीकारीत आहे की, जर त्याने कोणत्याही देय रकमेचा भरणा किंवा जी रक्कम जी अशा तारखेच्या पूर्वीच्या तारखेला देय घोषित करण्यात आली असले त्याचा भरणा ती देय झाल्यावर केला नाही, किंवा त्याने आयसीआयसीआय बँकेसोबत झालेल्या कराराप्रमाणे ज्या अंतर्गत कार्डधारक कोणतीही वित्तीय/पत/किंवा अन्य सुविधा उपभोगत आहे त्यात वागण्यात चूक केली, तर आयसीआयसीआय बँक आपल्या स्वविवेकाने, कोणताही दूषित पूर्वग्रह न ठेवता, बँकेसमोर उपलब्द

असलेल्या या अटी आणि शर्तीअंतर्गत सर्व किंवा कोणताही एक अधिकार अथवा उपाय किंवा कायद्याप्रमाणे उपलब्ध मार्ग यांचा वापर करण्यासाठी कार्यवाही करू शकेल.

(L) इतर अधिकारांना पूर्वग्रहदूषित न ठेवता, आयसीआयसीआय बँक तिला विलंबाने होणाऱ्या भरण्याबाबत क्रेडिट कार्ड विशेषाधिकार राखून ठेवीत आहे, या अंतर्गत व्यापारी प्रतिष्ठांनांना क्रेडिट कार्डचा सन्मान न करण्याचे बँक सांगू शकते. कार्डधारक हे देखील स्वीकारीत आहे की आयसीआयसीआय बँक आपल्या स्वविकाने स्वत: किंवा तिच्यातर्फे नियुक्त प्रतिनिधी/अभिकर्त्यांद्वारे शुल्काचा भरणा करण्याबाबत अनुसरण करू शकेल, जे त्याच्या कार्डावर खर्च केल्या गेले असतील. कार्डधारक हे ही स्वीकारीत आहे की, तो देय रकमेबरोबरच, सर्व प्रकारचे झालेले खर्च (कायदेशीर खर्चासह), जे अशा देय भरणा प्राप्तीसाठी खर्च केले असतील, त्याचप्रमाणे आयसीआयसीआय बँकेद्वारे संबंधित आणि प्रसंगापात बाकीसाठी, आयसीआयसीआय बँकेद्वारे खर्च केल्या गेले असतील, ज्यामध्ये समाविष्ट असतील: कार्डाचे नूतनीकरण, दुसरे कार्ड देणे, दोबार विवरणी/शुल्क पावतीसाठी झालेला खर्च, रोख अग्रिमसाठी व्यवहार शुल्क, बाहेरील गावांच्या धनादेश संग्रहणासाठी झालेला खर्च, दंडनीय शुल्क जे परत आलेल्या भरण्यासाठी करण्यात येईल आणि तत्सम खर्च आणि कायदेशीर कार्यवाही सुरु झाल्यावर होणारे कायदेशीर खर्च आणि डिक्रीसंबंधी रक्कम व्याजासह.

शुल्कांच्या तपशीलासाठी प्रशुल्क जोडपत्र बघावे.

## VII. रोख रक्कम काढण्याबाबत

कार्डधारक ह्या कार्डाचा उपयोग करून आयसीआयसीआय बँकेच्या शाखांच्या टेलर काउंटरमधून/स्वयंचालित टेलर मशिन्स् (एटीएमस्) ज्या आयसीआयसीआय बँकेच्या निवडक ठिकाणी आहेत/किंवा पूरक बँक्स्/ इतर ठिकाणे ज्यांनी आयसीआयसीआय बँकेद्वारे निश्चित करण्यात आले आहे त्यामधून आकस्मिकरीत्या निघणारी रोख रक्कम काढू शकेल. मात्र एकावेळी काढली जाणारी अशी रक्कम, आयसीआयसीआय बँकेने कार्डधारकाला स्पष्टपणे दिलेल्या रोख मर्यादेपेक्षा जास्त असून नये. कार्डधारक एटीएमद्वारा दिल्या जाणारे व्यवहारपत्रक संभाळून ठेवले. सर्व प्रकारच्या शुल्कांसाठी त्यावर व्यवहार शुल्क आकारण्यात येईल आणि ते बिलाच्या स्वरूपात कार्डधारकाला पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्राद्वारे पाठविण्यात येईल. या व्यतिरिक्त सर्व प्रकारच्या रोखीच्या रकमा काढण्यासाठी, सरासरी दैनिक प्रदत्त बाकी पद्धतीप्रमाणे अशी रक्कम काढल्या गेलेल्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेला भरणा प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी सेवा शुल्क लागू होईल. हे सेवा शुल्क कार्डखात्यात नामे म्हणून वळते केले जाईल. वरील नमूद व्यवहार शुल्क आणि सेवा शुल्क हे ना परतावा स्वरूपाचे असेल.

## VIII. दूरध्वनीबाबत ड्राफ्ट मिळण्याबाबत (ड्राफ्ट ऑन फोन)

आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या ग्राहक सेवा केंद्रामार्फत, कार्डखात्यावर ड्राफ्ट प्रदान करण्याबाबत, दूरध्वनीवर विनंती करण्यात येऊ शकते. असे सर्व ड्राफ्टस् रोख–मर्यादेच्या आतील राशींकरिताच प्रदान करण्यात येतील आणि अशा सर्व ड्राफ्ट दिल्याच्या तारखेपासून तो कार्डधारक त्याचा पुनर्भरणा आयसीआयसीआय बँकेला करेपर्यंतच्या अवधीसाठी देय असेल. सेवाशुल्क आयसीआयसीआय बँकेच्या प्रचलित दराने कार्ड खात्यातून नावें खर्ची (डेबीट) घातले जाईल. उपरोक्त नमूद व्यवहार शुल्क आणि सेवा शुल्क हे ना–परतावा स्वरूपाचे आहेत. कार्डधारकाला कुठलीही पूर्वसूचना दे देता आणि कार्डधारकाला उत्तरदायी न राहता कुठल्याही वेळी या सुविधा खंडित करण्याचा अधिकार आयसीआयसीआय बँक राखून ठेवते. एकदा जारी केलेला ड्राफ्ट टपाल वा कुरीयरद्वारे, कार्डधारकाचा जो पत्ता आयसीआयसीआय बँकेच्या रेकॉर्डवर अखेरच्यावेळी नोंदवण्यात आला असेल, त्या प्रेषित पत्त्यावर पाठविण्यात येईल. आयसीआयसीआय बँक 24– तास ग्राहक सेवा केंद्राला विनंती प्राप्त झाल्यापासूनच्या 4 कामकाज दिवसांच्या आंत ड्राफ्ट पोचवणीसाठी हर तऱ्हेने प्रयत्न केले जातात. तरी देखील याबाबत कुठलेही आश्वासन देण्यात येत नाही. ड्राफ्ट पोचवणीच्या विलंबाबाबत आयसीआयसीआय बँक जबाबदार राहणार नाही. जर ड्राफ्ट गहाळ झाला किंवा तो रद्द करावयाचा असेल तर (आयसीआयसीआय बँकेला स्वीकार्य अशा अर्जात) यथोचित सादर केलेले क्षतिपूर्ती पत्र प्राप्त झाल्यावर, कार्डखात्यातील जमा करून आयसीआयसीआय बँक मुद्दल परत करेल. ड्राफ्ट रद्द करावयाचा असल्यास, संबंधित ड्राफ्ट परत करावाच लागेल आणि रद्द करण्याचे शुल्क त्यावर आकारले जाईल. ड्राफ्ट जर चोरीस गेला/गहाळ झाला तर तो बदलून देण्यात वा भरपाईसाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार राहणार नाही.

## IX. विमा लाभ

विमा कंपनीशी केलेल्या जुळवणी (टाय–अप)च्या माध्यमातून आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्डधारकाला वेळोवेळी विम्याचे लाभ/फायदे प्रस्तावित केले जाऊ शकतात. दाव्याच्या सर्व प्रकरणांमध्ये दावा चुकता करण्यासाठी विमा कंपनी संपूर्णत: उत्तरदायी राहील आणि कार्डधारक आयसीआयसीआय बँकेला कुठल्याही कारणांसाठी जसे की भरपाई, भरपाईची वसुली, दावे संस्करण किंवा इतर कुठल्याही कारणांसाठी जबाबदार धरणार नाही. खालील परिच्छेदाच्या शर्तींना अधीन राहून, कार्डधारकाद्वारे थेट किंवा आयसीआयसीआय बँकेच्या माध्यमातून अग्रेषित करण्यात आलेल्या, विमा नामनिर्देशन अर्जावरील नाव आणि यथोचित साक्षांकित स्वाक्षरी असलेल्या आणि कार्डधारकाद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तीला, विमा कंपनीतर्फे मान्य अशी देय रक्कम जारी करून विमा कंपनी ही तिच्या सर्व दायित्वापासून मुक्त होईल. नामनिर्देशनातील कुठल्याही बदलाची लेखी सूचना कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेतर्फे देण्यात येईल. कार्डधारक पुढे अभिस्वीकृत करतो की, आपले कार्डखाते योग्य आणि नियमित असल्याकारणाने आणि कुठलाही कसूर न आढळल्याने, कार्डधारक जोवर आयसीआयसीआय बँकेचा कार्डधारक आहे आणि असतो, तोवर कार्डधारकाला अशा रीतीने देण्यात येणारे विमा लाभ उपलब्ध असतील. कार्डधारक पुढे मान्यता देतो की, जोवर कार्डावरील सर्व अदत्त दायित्वाची समाधानकारक फेड कार्यधारकाद्वारे होत नाही, तोवर विमा दाव्याची राशी जी आयसीआयसीआय बँकेच्या निर्देशानुसार, निलंबलेखी ठेवण्यात येऊ शकते. अशा प्रसंगात जेथे ज्या कुठल्याही कारणांनी कार्डसुविधा समाप्त करण्यात येते, तेथे असे सर्व विमा लाभ आपोआप आणि वस्तुत: सदस्यत्व विरामनाच्या तारखेपासून प्राप्त होण्याचे संपुष्टात आणले जातील. आयसीआयसीआय बँक कुठल्याही वेळी (त्याबाबत आपल्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात कुठलीही पूर्वसूचना दिल्याशिवाय) या विमा लाभांमध्ये फेरबदल, निलंबन, परत घेणे वा रद्द करणे हे निर्णय घेऊ शकते आणि या लाभांच्या निरंतरतेच्या बंधनासाठी बाध्य नसेल.

## X. क्रेडिट कार्ड गहाळ गहाळ होणे, चोरीस जाणे वा त्याचा गैरवापर होणे

कार्ड जर हरवले वा चोरीला गेले तर कार्डधारकाने या चोरीची/ हरवण्याची माहिती आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केयरमध्ये (ग्राहक सेवा) 24 तासाच्या आत या चोरीची/ हरवण्याची माहिती कळवणे आवश्यक आहे. मात्र, चोरीला गेल्यामुळे कार्ड हरवले असेल तर कार्यधारकाला स्थानिक पोलीस ठाण्यात तसा तक्रार अर्जही करणे आवश्यक आहे. आयसीआयसीआय बँकेने या तक्रार अर्जाची कॉपी मागितल्यास ती कार्डधारकाला देता येणेही गरजेचे आहे. योग्य तेवढी सत्यता पडताळल्यानंतर आयसीआयसीआय बँक कार्ड खाते निलंबित करेल आणि त्या संबंधीच्या सर्व सुविधा रद्द करेल आणि कार्डधारकाला होणाऱ्या कोणत्याही असुविधेची जबाबदारी आयसीआयसीआय बँकेची असणार नाही.

अशा प्रसंगामध्ये, कार्डधारक त्वरेने कार्डचे 4 तुकडे करून कार्ड रद्द करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेला परत करेल. कार्डधारक हा कार्डच्या सुरक्षितेसाठी जबाबदार राहील आणि कार्डचा गैरवापर होत नसल्याची खातरजमा करण्यासाठी सर्व उपाययोजना करेल. आयसीआयसीआय बँकेने निश्चित केले की वर नमूद केलेल्या कार्ड गहाळ होणे/चोरीस जाणे /कार्ड नष्ट करणे या प्रकरणी योग्य ती पावले उचलण्यात कार्डधारक असमर्थ ठरल्यास आणि ते संदेहास्पद असल्यास अशा प्रकरणांमध्ये गहाळ होणे/ चोरीला जाणे किंवा कार्ड खराब होणे याबाबत आर्थिक दायित्व कार्डधारकाचे असेल आणि अगदी त्या परिणामी कार्ड रद्द होई शकते.

कार्ड हरवल्याची/ चोरीला गेल्याची/ खराब झाल्याची माहिती नोंदवल्यानंतर आणि आयसीआयसीआय बँकेने कार्ड खाते निलंबित केल्यांतर झालेल्या कोणत्याही अनधिकृत व्यवहाराचे दायित्व कार्डधारकावर राहणार नाही. कार्ड हरवल्याची/ चोरीला गेल्याची/ खराब झाल्याची माहिती नोंदवल्यानंतर कार्डावर झालेल्या कोणत्याही व्यवहाराचे दायित्व बँकेवर राहील. मात्र सदर कार्ड हरवल्याची/ चोरीला गेल्याची/ गैरवापर झाल्याची माहिती दिल्यानंतर अशी नोंद करण्याच्या वेळेबाबत किंवा/ आणि कार्डावर केलेल्या व्यवहाराबाबत कोणताही वाद असल्यास वादग्रस्त व्यवहाराच्या वेळेसंबंधी आणि/किंवा खरेपणाविषयी खात्री करून घेण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक स्वत:जवळ राखून ठेवत आहे.

## XI. दायित्वाची वगळणूक

आयसीआयसीआय बँकेजवळ उपलब्ध असलेल्या उपायांबाबत आणि या अटींबाबत कुठलाही पूर्वग्रह न बाळगता, आयसीआयसीआय बँक कार्डधारकाला कुठल्याही प्रकारे अशा नुकसान व हानीसंदर्भात उत्तरदायी राहणार नाही जी प्रत्यक्षपणे वा

अप्रत्यक्षपणे यातून निर्माण होऊ शकते :

a) कुठल्याही मालाच्या व सेवांच्या प्रदानातील कुठलाही दोष;

b) कार्डाचा सन्मान करण्यात वा स्वीकार करण्यातील कुठल्याही व्यक्तीचा/व्यापार आस्थापनेचा नकार;

c) कुठल्याही संगणक टर्मिनलमधील बिघाड;

d) कार्डधारकाद्वारे आयसीआयसीआय बँक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्याशिवाय इतर कुणालाही कार्ड हस्तांतरित करणे;

e) कार्डधारकाद्वारे आयसीआयसीआय बँक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्याशिवाय इतर कुणालाही कार्ड हस्तांतरित करणे;

f) आयसीआयसीआय बँकही कार्डाची मागणी करण्याचा आणि कार्डावरील नमूद मुदतीच्या समाप्तीपूर्वी ते संपादित करण्याचा, जरी ते आयसीआयसीआय बँकेकृत आहे, आपल्या अधिकारांचा योग्य वापर करीत आहे;

g) कुठलेही कार्ड आणि कार्डखाते समाप्त करण्याचा आपल्या अधिकारांचा आयसीआयसीआय बँकेद्वारे होणारा योग्य वापर;

h) कार्डाचा पुन:ताबा मिळविण्यासाठी पत चारित्र्याला आणि कार्डधारकाला प्रतिष्ठेला कथितरीत्या घडलेली कुठलीही बाधा आणि / अथवा, कार्ड परत करण्याची कुठलीही विनंती किंवा कार्डाचा सन्मान वा स्वीकार करण्यात कुठल्याही व्यापारी प्रतिष्ठानाने / मेल ऑर्डर संस्थापनेने दिलेला नकार;

i) कुठलेही चुकीचे विवरणपत्र, चुकीचे प्रतिनिधीत्व, आयसीआयसीआय बँकेद्वारे जाहीर कुठल्याही तपशीलातील चूकभूल;

अशा प्रसंगात, जेथे कार्डधारकाकडून येणे असलेल्या अदत्त रक्कमेबाबत हिशेब चुकता करण्याची मागणी वा दावा, आयसीआयसीआय बँक वा आयसीआयसीआय बँकेच्या वतीने कार्यरत कुठल्याही व्यक्तीतर्फे केला जातो, कार्डधारक हे मान्य आणि अभिस्वीकृत करतो की अशी मागणी वा दावा म्हणजे कार्डधारकाच्या प्रतिष्ठेची कुठल्याही पद्धतीने बदनामी करणारे वा पूर्वग्रहदूषित असे कृत्य समजले जाणार नाही.

जोडणीक्षमता आणि सेवा यावर किंवा इतर घटकांवर अवलंबून आहे. कार्डधारक स्वीकारतो की आयसीआयसीआय बँकेने दिलेल्या इशाऱ्यांच्या वेळा, अचूकता आणि वाचनीयता आयसीआयसीआय बँकेने काम दिलेल्या इतर सेवा पुरवठादारांवर प्रभाव पाडणारे इतर घटकांवर किंवा इतर कारणांवर अवलंबून असेल. इशारे न मिळणे किंवा उशीरा मिळणे, कार्डधारकाला इशारे पाठविताना चूक, हानी किंवा संदेशवहनादरम्यान बिघाड होणे यासाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार नसेल.

## XII. शिल्लक (बॅलन्स) हस्तांतरण सुविधा

**'सुविधा'** हा केवळ आयसीआयसीआय बँकेचा संपूर्ण अधिकार असून, कार्डधारकाच्या इतर बँकांच्या क्रेडिट कार्डावरील देय रक्कम कार्डधारकाला दिलेल्या /देण्याचे मान्य केलेल्या कार्डावर कार्डाच्या उपलब्ध मर्यादेपलीकडे न जाता ट्रान्सफर करणे असा त्याचा अर्थ होतो.

**'ईझी बीटी'** म्हणजे कार्डधारक पेमेंट करण्याची पद्धत बदलून सम मासिक हप्त्यांमध्ये (इक्वेटेड मन्थली इन्स्टॉलमेंट्स) ती बदलून घेतो/ घेते ती सुविधा.

**'ईएमआय' किंवा 'इक्वेटेड मन्थली इन्स्टॉलमेंट'** म्हणजे कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेला या सुविधेपोटी भरायचा असलेला हप्ता, ज्यात सुविधेची मूळ रक्कम आणि त्यावर लागू झालेल्या व्याजाचा समावेश असेल.

**सुविधेचा उपयोग:**

या सुविधेअंतर्गत, आयसीआयसी बँकेने आपल्या अधिकारात निर्णय घेतल्यास, कार्डधारकाला इतर बँकांनी/ संस्थांनी दिलेल्या क्रेडिट कार्डावरील संपूर्ण किंवा काही भागांमधील देय रक्कम आपल्या कार्ड खात्यावर ट्रान्सफर करण्यास वा वळवण्यास आयसीआयसीआय बँक संमती देऊ शकते. ही ट्रान्सफर डिमांड ड्राफ्टद्वारे केली जाऊ शकते जो आयसीआयसीआय बँकेकडे नोंदवलेल्या कार्डधारकाच्या पत्त्यावर पाठवण्यात येईल जो इतर बँकेच्या/ संस्थेच्या कार्डधारकाच्या क्रेडिट कार्डाच्या खात्याचा असेल व कार्डधारकाच्या इतर बँकेच्या/संस्थेच्या कार्डखात्यावरील रकमेचा असेल जेवढ्या रकमेची सुविधा संमत झालेली

असेल. आयसीआयसीआय बँकेने ही सुविधा एकदा दिल्यानंतर/ देण्याचे मान्य केल्यानंतर कार्डधारकाच्या इतर क्रेडिट कार्डाशी संबंधित तो देय असलेल्या कोणत्याही ओव्हरड्यू पेमेंटचे वा सेवा शुल्काचे दायित्व आयसीआयसीआय बँकेचे असणार नाही. दुसरे क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेला/ संस्थेला सुविधेमधील ट्रान्सफर झालेली रक्कम मिळेपर्यंत कार्डधारक या दुसऱ्या क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेला/संस्थेला पेमेंट करत राहण्यास बांधील असेल. शिवाय, कार्डधारकाला त्याच्या भविष्यातील स्टेटमेंटमध्येही त्याच्या इतर क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेच्या/ संस्थेच्या कार्डखात्यामध्ये तेवढी रक्कम जमा केली असल्याची नोंद येऊन त्याबाबतची खात्री दिली जाईल. ही सुविधा प्राथमिक कार्ड सभासद तसेच पूरक कार्ड सभासद, या दोघांनाही उपलब्ध असले, मात्र ती कार्डधारकाच्या उपलब्ध कॅश लिमिट आणि/ किंवा क्रेडिट लिमिटवर अवलंबून असेल आणि या सुविधेची विनंती करणाऱ्या कार्डधारकाला ती देण्यात येईल.
कार्डधारकाला मंजूर केलेल्या सुविधेपोटी जी रक्कम देण्यात येईल त्यामुळे कॅश लिमिट आणि/किंवा क्रेडिट लिमिट ब्लॉक केले जाईल. या सुविधेपोटी कार्डधारकाला परत न मिळणारी प्रोसेसिंग फी भरावी लागेल जी आयसीआयसीआय बँकेने ठरवलेल्या टक्केवारीत असेल व दर परिपत्रकात ती नमूद केलेली असेल. प्रोसेसिंग फी आणि व्याजाच्या रकमेवर सेवा कर लागू होईल जो आयसीआयसीआय बँकेच्या चालू दरांनुसार असेल. त्या ठराविक महिन्याच्या स्टेटमेंटमध्ये ही रक्कम दर्शवण्यात येईल.

**परतफेड:**

ही सुविधा इझी बीटीची असल्या, कार्डधारक ही सुविधा व त्यावरील व्याज त्यानंतर ईएमआयने भरेल. ही सुविधा देऊ करताना आयसीआयसीआय बँकेने कार्डधारकाला सूचित केलेला व त्यानंतर कार्डधारकाला कळवलेला असा हा व्याज दर असेल. इझी बीटीच्या संदर्भातील कार्डधारकाची विनंती मान्य केल्यानंतर व्याज मोजण्यास सुरुवात केली जाईल. ईएमआयची रक्कम व सुविधेचे (व्याज दरासहित) इतर तपशीलही कार्डधारकाला त्याच्या/तिच्या पत्त्यावर कळवण्यात येतील.

ठराविक महिन्यामध्ये देय असलेली ईएमआयची रक्कम त्या महिन्याच्या स्टेटमेंटमध्ये प्रतिबिंबित होईल. या स्टेटमेंटद्वारे सांगण्यात आल्यानुसार, त्या ठराविक महिन्यामध्ये देय असलेली ईएमआयची रक्कम दर महिन्याला कार्डधारकाच्या कार्ड खात्यामधून वजा करून घेण्याचा हक्क/ अधिकार आयसीआयसीआय बँकेला आहे. कार्डधारकाने परतफेड केल्यानंतर कार्डधारकाने परतफेड केलेल्या ईएमआय रकमेएवढ्या मर्यादेत कॅश लिमिट / क्रेडिट लिमिट पुन्हा वाढवले जाईल.
पेमेंटच्या देय तारखेच्या दिवशी स्टेटमेंटमध्ये दर्शवल्यानुसार त्या त्या महिन्याच्या ईएमआयची संपूर्ण रक्कम भरणे कार्डधारकाला आवश्यक आहे व ही रक्कम पुढच्या स्टेटमेंटमध्ये समाविष्ट करता येणार नाही. सूचित केल्यानुसार पेमेंटच्या देय तारखेला पेमेंट केले गेले नाही तर कार्डधारकाने केलेली ती चूक (डिफॉल्ट) मानली जाईल आणि कार्डधारकाला त्याच्या सुविधेअंतर्गत लावण्यात आलेल्या व दर परिपत्रकात नमूद केल्या गेलेल्या व्याजासह ही रक्कम भरावी लागेल.
ईझी बीटीव्यतिरिक्त इतर बाबींमध्ये सुविधेअंतर्गत असलेली रक्कम ही एकूण देय रक्कम आणि/किंवा देय झालेली ईएमआयची रक्कम यांचाच भाग बनेल व ती नियम 6,34 मध्ये अनुक्रमे नमूद केल्यानुसार त्याच पद्धतीने भरावी लागेल.

**सुविधा बंद करणे:**

ही सुविधा ईझी बीटीची असल्यास, सुविधेच्या परतफेडीच्या काळाआधीच ती रद्द केली गेली/ बंद करण्यात आली तर, तीती रद्द केली जाण्याच्या/ बंद केली जाण्याच्या वेळेस सुविधेवरील शिल्लक असलेली रक्कम त्यावरील व्याजासहित आणि सुविधेशी संबंधित इतर सर्व रकमेसकट कार्डधारकाने ताबडतोब परत करणे बंधनकारक होईल.
कार्डधारक कोणत्याही क्षणी ही सुविधा बंद करू शकतो आणि आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केयर सेंटरशी संपर्क साधून तसे सांगू शकतो. ही सुविधा देतेवेळी आयसीआयसीआय बँकेने कार्डधारकाला सांगितलेले सुविधा रद्द करण्यासाठीचे शुल्क कार्डधारकाला भरावे लागेल.
लागोपाठ दोन महिने ईएमआयची रक्कम भरण्यास कार्डधारकाने चूक केल्यास आयसीआयसीआय बँक, कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय, कार्डधारकाला सुविधेअंतर्गत असलेली सर्व रक्कम आणि त्यावर लागू झालेले तोवरचे व्याज व सुविधेशी संबंधित इतर सर्व रकमेसकट कार्डधारकाला परतफेड करण्यास सांगण्याचा हक्क राखून ठेवते आणि अशी मागणी केल्यास अशा सर्व रकमेची परतफेड करणे कार्डधारकास बंधनकारक ठरते.

**सुविधा रद्द करणे:**
ही सुविधा दिल्यानंतर 15 दिवसांच्या आत आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केयर सेंटरशी संपर्क साधून कार्डधारक ती रद्द करू शकतो.
अशा प्रकारे सुविधा रद्द केल्यास डिमांड ड्राफ्ट क्रेडिट कार्ड ऑपरेशन्स, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, एम्पायर कॉम्प्लेक्स, 414, एसबी मार्ग, लोअर परेल, मुंबई – 400 013 येथे परत केल्यानंतरच ती रद्द झाल्याचे समजण्यात येईल, तसेच कार्डधारक किंवा ज्यांच्या नावाने ड्राफ्ट काढला आहे त्यांनी तो कॅश केलेला असता कामा नये.

## XIII. अनूपूरक कार्ड (सप्लीमेंट्री कार्ड)

प्राथमिक कार्ड धारकाने ॲड ऑन कार्ड प्राथमिक कार्डधारकाच्या कुटुंबातील एक किंवा अधिक व्यक्तींसाठी देण्याची विनंती केल्यास, आयसीआयसीआय बँक केवळ स्वत:च्या अधिकारात आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी ठरवलेल्या अटी व नियमांनुसार प्राथमिक कार्डधारकाच्या कुटुंबातील व्यक्तींना पूरक कार्ड देण्याचा निर्णय घेईल. या पूरक कार्डाचा वापर केला याचा अर्थ या अटी व हे नियम स्वीकारले असल्याचे गृहित धरण्यात येईल. पूरक कार्डधारक आणि प्राथमिक कार्डधारक, असे कार्ड दिल्याची अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर, एकत्रितपणे वा वेगवेगळे या नियम व अटींना/पेमेंटसाठी उत्तरदायी ठरतील, मात्र पूरक कार्डावर देय असलेली सव शुल्के भरली जात असल्याचे पाहणे ही प्राथमिक कार्डधारकाची जबाबदारी मानली जाईल. पूरक कार्डाची सुविधा ही आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी ठरवलेली फी देऊन/ दर देऊन मिळालेली खास सुविधा असून, पूरक कार्डधारकाचे सभासदत्व चालू राहणे हे केवळ प्राथमिक कार्डधारकाचे सभासदत्व चालू राहण्यावर अवलंबून असेल.

## XIV. बिलिंग

सर्व कार्डधारकांना कार्डाच्या उपयोगाचे सर्व शुल्क आणि कार्डखात्याला लागू असलेल्या सर्व शुल्कांसाठी दरमहा आधारावर देयक (बिल) पाठविण्यात येईल. कार्डधारकाला विवरण पत्र पाठविण्यात कुठलाही विलंब होणार नाही, यासाठी आयसीआयसीआय बँक प्रयास करेल. तरीसुद्धा ज्या अवधीत कुठलेही अदत्त बाकी नसेल आणि त्यासाठी पूर्वगामी महिन्यांमधील कार्डखात्यावर कुठलाही व्यवहार झालेला नसेल तर त्या अवधीसाठी कुठलेही विवरणपत्र असणार नाही.

विवरणपत्राला केवळ कार्डधारकाद्वारेच प्रवेशन असावे याची खात्री असण्यासाठी आयसीआयसीआय बँक ऑनलाईन विवरणपत्र योग्य त्या सुरक्षेसह प्रदान करण्याचा प्रयास करेल.

अशा प्रसंगात ज्या मध्ये ज्या कुठल्याही कारणांनी विवरणपत्र प्राप्त झालेले नाही, आणि ते पाठविताना आयसीआयसीआय बँकेच्या बाजूने विलंब नसल्याकारणाने, कार्डधारक आयसीआयसीआय बँकेला एकूण देय रक्कम भरणा देय करण्याच्या तारखेपर्यंत, त्याच्या ताब्यातील शुल्क पावतींचा उपयोग करून हिशेब केलेल्या किंवा आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास ग्राहक सेवा केंद्राला फोनद्वारे चौकशी करून प्रदान करेल.

## XV. व्यापारी (मर्चंट) आधारित हप्ते योजनेच्या अटी

**'ईएमआय'** किंवा **'इक्वेटेड मन्थली इनस्टॉलमेंट'** याचा अर्थ कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेला देय असलेली रक्कम मासिक हप्त्यामध्ये भरणे ज्यात मूळ रक्कम, व्याज आणि लागू असल्यास कोणत्याही/ किंवा इतर शुल्के यांचा समावेश असेल.

**'त्वरित ईएमआय'** याचा संदर्भ कार्डधारकाने आयसीआयसीआय बँक ईडीसी (इलेक्ट्रॉनिक डाटा कॅप्चर) टर्मिनल आणि/ कॅप्चर) टर्मिनल आणि / किंवा अशा प्रकारच्या ऑनलाईन व्यवहारामध्ये कार्डाचा वापर करून व्यवहार केल्यास आणि असा बदल करण्याचा पर्याय उपलब्ध असेल तर विनंती केल्यास ईएमआयमध्ये बदल करण्याशी आहे.
झालेल्या खर्चाचा भरणा कार्डधारकाने त्वरित करण्याच्या त्याच्या हेतूंबाबत कुठलाही पूर्वग्रह न बाळगता, आयसीआयसीआय बँक आपल्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात व्यक्तिगत कार्डधारकाला क्रेडिट कार्डावरील हप्तेवारी योजना उपलब्ध करून देत. काही खरेदींचा भरणा करण्याचा पर्याय कार्डधारक सामायिक मासिक हप्त्यांद्वारे स्वीकारू शकतो, ज्या बाबत कार्डधारकाला आयसीआयसीआय बँक 24–तास ग्राहक सेवा केंद्रातर्फे कळविण्यात येईल आणि कार्डधारकाला पाठवण्यात येणाऱ्या विवरणपत्रात त्याची नोंद असेल

आणि ज्याच्या अटी खालीलप्रमाणे असतील:

1. कार्डधारकांनी एकदा ईएमआयद्वारे भरणा करण्याचा पर्याय स्वीकारल्यानंतर, पाठोपाठ होणारा कुठलाही बदल हा खरेदीच्या स्वरूपावर आधारित आणि आयसीआयसीआय बँकेतर्फे वेळोवेळी निश्चित पूर्व–समाप्तीसाठी पात्र राहील.
2. अशा प्रसंगात जेथे बिल आकारणी झालेल्या आणि अदत्त शुल्कांच्या काही भागांचा भरणा आयसीआयसीआय बँकेद्वारे करण्याचे नाकारले जाते, तेथे अशा राशीवर कलम 6 मधील नमूद केल्याप्रमाणे आणि दराप्रमाणे व्याज, सेवा शुल्क आणि विलंब भरणा शुल्क यांचे वाहन आणि आकारणी होईल.
3. क्रेडिट कार्ड संदर्भात ईएमआय सुविधा सध्या खालील समाविष्ट खरेदींसाठी उपलब्ध होईल, जसे की,
   अ. व्यापारी आस्थापनेतील नवी खरेदी;
   ब. मागील खरेदींचे (आयसीआयसीआय बँकेच्या 24–तास ग्राहक सेवा केंद्रांच्या माध्यमातून) रुपांतरण;
4. ईएमआय सुविधा ही कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात प्राप्त होईल आणि अशी सुविधा यासाठी उपलब्ध होईल:
   अ. अशा अवधीसाठी आणि अशा व्यापारी प्रतिष्ठानांसाठी ज्याचे निर्धारण आयसीआयसीआय बँकेतर्फे केल्या जाऊ प्रट्क्रजाऊ शकते;
   ब. ईएमआयचे व्याज–घटन हे आयसीआयसीआय बँकेतर्फे निर्धारित असे निर्दिष्ट कार्डधारक आइण निर्दिष्ट व्यापारी असतील;
   क. खरेदीपूर्व भरणा (डाऊन पेमेंट) रक्कम, व्यवहार शुल्काची रक्कम, ईएमआय भरणा करण्याचा कार्यकाळ आणि इतर भरणाविषयक बाबी कार्डधारक निर्दिष्ट आणि व्यापारी निर्दिष्ट असतील, ज्यांचे निर्धारण आयसीआयसीआय बँक करू शकेल.

## XVI. ऑटो डेबिट सुविधा:

कार्डावरील देय रक्कम भरण्यासाठी कार्डधारक ऑटो डेबिट सुविधा घेऊ शकतो/ शकते. ऑटो डेबिट सुविधा घेतल्यानंतर, कार्डधारकाच्या बँक खात्यातून (ज्याचे तपशील आयसीआयसीआय बँकेला पुरवले जातील) कार्डधारकाला पाठवलेल्या स्टेटमेंटमध्ये दर्शवल्यानुसार पेमेंट ज्या दिवशी देय होईल त्या दिवशी (ड्यू डेटला) वर नमूद केलेली रक्कम वजा केली जाईल. मात्र, पेमेंटची ड्यू डेट हा व्यवसायाचा दिवस असेल तरच तसे केले जाते अन्यथा, सुट्टीच्या नंतर ताबडतोब येणाऱ्या पुढच्या व्यावसायिक दिवशी बँक खात्यातून ही रक्कम वजा केली जाते. पेमेंट ड्यू डेटच्या दिवशी संबंधित बँक खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्यास, कार्डधारकास कार्डावरील देय रकमेखेरीज लागू होणारी अतिरिक्त रक्कमही भरावी लागेल. कार्डधारक हे मान्य करतो/करते व अशी खात्री देतो/देते की, कार्डधारकाने ऑटो डेबिट कार्डाची सुविधा मागण्यासाठी आयसीआयसीआय बँकेला पुरवलेली सर्व माहिती ही सत्य व संपूर्ण असेल. अपूर्ण व असत्य माहितीमुळे वा इतर कुठल्याही कारणामुळे ऑटो डेबिट व्यवहारास उशीर झाला किंवा अजिबात पूर्ण झाला नाही तर त्याची जबाबदारी आयसीआयसीआय बँकेची असणार नाही. कार्डधारक असेही मान्य करतो/करते की कार्डधारकाच्या बँकेला ते आयसीआयसीआय बँकेच्या बाजूने ऑटो डेबिटबाबत सूचना देऊन ठेवतील व आयसीआयसीआय बँकेची पूर्व परवानगी घतल्याखेरीज संबंधित बँक खाते बंद केले जाणार नाही. अशा सूचना या आयसीआयसीआय बँकेच्या लेखी परवानगीशिवाय मागे घेता वा रद्द करता येणार नाहीत.

## XVII. परत गेलेली पेमेंट्स

कार्डावर देय असलेल्या रकमेचा कार्डधारकाने दिलेला चेक किंवा दुसऱ्या कुठल्या मार्गाने दिलेले पेमेटं किंवा सूचना जर पाळली गेली नाही किंवा त्या पेमेंटवर प्रक्रिया करता येत नाही म्हणून कार्डधारकाकडे परत गेली तर कार्डधारकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे आइण स्वत:च्या अधिकारात शुल्क आकारले आणि/ किंवा ताअपुरते/ कायमस्वरूपी कार्ड रद्द करण्याची निर्णय घेऊ शकते. परत गेलेल्या चेकवरील शुल्क आणि लेंट पेमेंट शुल्क किंवा आयसीआयसीआय बँकेने ठरवलेले इतर काही शुल्क देणे कार्डधारकाला भाग आहे.

## XVII. वाद

आयसीआयसीआय बँकेकडे आलेली कोणतीही शुल्काची स्लिप किंवा पेमेंटची लेखी मागणी हा अशा शुल्क स्लिपवर किंवा इतर कुठल्या मागणीवर नोंद झालेले शुल्क हे योग्य असल्याचा तो ठोस पुरावा मानला जाईल, क्रेडिट कार्ड हरवले, चोरीला गेले किंवा

गैरमार्गाने वापरले गेले असल्यास व वर दिलेल्या 9 व्या नियमानुसार त्याची तक्रार केलेली असल्यासच केवळ अपवाद केला जाईल आणि त्याचा पुरावा देण्याची जबाबदारी ही कार्डधारकाची राहील. या नियमामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या कोणत्याही आणि सर्व पेमेंटच्या मागण्यांमध्ये कार्डधारकाने व्यापारी प्रस्थापनेमध्ये कार्डाचा वापर करून केलेल्या परवानगीप्राप्त खर्चाचा समावेश होतो ज्याची शुल्क म्हणून नोंद होत नाही.

अशा शुल्काच्या स्लिप्सवरील कार्डधारकाची सही आणि त्यावर नोंद असलेला कार्डाचा नंबर यो दोन्ही गोष्टी कार्डधारकाने केलेल्या दायित्वाचा एकत्रित ठोस पुरावा म्हणून मानल्या जातील. एपीआयएन/ पासवर्ड/ युझर– आयडी यांचा वापर करून आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केअर सेंटर/ इनफिनिटी येथे जाऊन आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास असलेल्या कस्टमर केअर सेंटर/ इनफिनिटीवर मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेतल्यास कार्डधारकाने व्यवहार केल्याचा ठोस पुरावा मानला जाईल. कार्डधारकाला खरेदी करण्यात आलेली वस्तू वा सेवा मिळालेली आहे की नाही याची खात्री करून घेण्याची आयसीआयसीआय बँकेला आवश्यकता नाही. स्टेटमेंटमध्ये दाखविण्यात आलेल्या एकाद्या शुल्काशी कार्डधारक सहमत नसल्यास, आयसीआयसीआय बँकेला तसे स्टेटमेंट मिळाल्यापासून 60 (साठ) दिवसांच्या आत कळवणे आवश्यक आहे. जर तसे कळवले गेले नाही तर स्टेटमेंटमध्ये दाखवण्यात आलेली सर्व शुल्के योग्य असल्याचे मानले जाईल.

## XIX. सुरक्षितता

सेक्युअर्ड क्रेडिट कार्डांच्या बाबतीत कार्डाच्या खात्यावरील भरायची सर्व रक्कम, ज्यात कार्डावरील व्यवहारांच्या शिल्लक रकमेवरील व्याजाचाही समावेश असेल, आणि खाली नमूद केलेले इतर सर्व खर्च, शुल्क जे लागू आहेत परंतु कार्डधारक कार्ड वापरत असताना कार्डाच्या खात्यावर अद्याप दाखवण्यात आलेले नाहीत, अशी सर्व रक्कम ही सिक्युरिटीज/फिक्स्ड डिपॉझिट्स/ आयसीआयसीआय बँकेने मंजूर केलेली अशी एखादी संपत्ती जी कार्डधारकाच्या स्वतंत्रपणे वा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीबरोबर एकत्रितपणे नावावर आहे, किंवा तिसऱ्या पक्षाच्या नावावरील सिक्युरिटीज यांचे आयसीआयसीआय बँकेने आखून दिलेल्या पद्धतीनुसार आणि त्या प्रकारे प्लेज/ हायपॉथिकेट केली जाईल. अशी सुरक्षा निर्माण करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे व पद्धतीने सर्व कागदपत्रे कार्डधारक आणून देईल. सुरक्षा निर्माण करण्यासाठी येणारा खर्च आणि इतर सर्व कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी येणारा खर्च ज्यात स्टॅम्प ड्युटी वगैरेंचा समावेश असले, परंतु तितकाच खर्च अंतर्भूत नसेल, असा सर्व खर्च कार्डधारकाला उचलावा लागेल.

## XX. जमा

कार्डधारकाची देय रक्कम जमा करण्यासाठी आणि/ किंवा कार्डधारकाने पुरवलेली सुरक्षा अंमलात आणण्यासाठी एक वा अधिक व्यक्तींना काम देण्याची मुभा आयसीआयसीआय बँकेला असून त्याचा संपूर्ण धोका व खर्च हा कार्डधारकाचा असेल आणि (अशा कामासाठी नेमलेल्या) या व्यक्तींना कार्डधारकाची आणि त्याने दिलेल्या सुरक्षेची माहिती, वस्तुस्थिती व आकडेवारी सांगण्याची मुभा आयसीआयसीआय बँकेला असून आयसीआयसीआय बँक योग्य वाटल्यास ती अंमलात आणू शकते. तसेच, आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल त्या पद्धतीने अशा व्यक्तीला आयसीआयसीआय बँक कोणतीही पावले उचलण्यास, कामे करण्यास, वागण्यास आणि त्यांच्या कामाशी संबंधित सर्व गोष्टी किंवा त्या निमित्ताने कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी करण्यास सांगू शकते.

## XXI. वस्तू व सेवांची गुणवत्ता :

व्यापारी प्रस्थापनेतून विकत घेतलेल्या वस्तू, त्यावरील वॉरंटी किंवा विकत घेतलेल्या सेवा यांची कोणतीही जबाबदारी आयसीआयसीआय बँकेची राहणार नाही, यात कार्डधारकाला वस्तू पोहोचवण्यासाठी झालेला उशीर, वस्तू घरपोच न मिळणे, वस्तू न मिळणे किंवा खराब होऊन मिळणे या गोष्टींचा ही समावेश होतो. क्रेडिट कार्ड ही वस्तू खरेदी करण्यासाठी आणि/किंवा सेवा मिळवण्यासाठी कार्डधारकाला देण्यात आलेली केवळ सुविधा असून, त्या व्यवहाराच्या गुणवत्तेबाबत, डिलिव्हरीबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत आयसीआयसीआय बँक कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही अथवा कोणतीही वॉरंटी देत नाही. व्यवहारासंबंधी निर्माण झालेला कोणतीही मागणी अथवा वाद कार्डधारकाने त्या व्यापारी प्रस्थापनेबरोबरच सोडवायला हवा. अशी मागणी वा वाद

अस्तित्त्वात आल्याने कार्डधारकाची आयसीआयसीआय बँकेला भराव्या लागणाऱ्या सर्व शुल्कांची जबाबदारी संपत नाही आणि अशी शुल्के ताबडतोब भरण्याचे कार्डधारक मान्य करतो/ करते.

## XXII. बाकी रकमेचा व्यवहार

खरेदी केल्यानंतर नावावर जमा झालेली रक्कम आणि वस्तू/ सेवा रद्द केल्याने ती रक्कम रद्द करणे हे दोन स्वतंत्र व्यवहार आहेत. कोणतेही अतिरिक्त शुल्क लागू होऊ नये यासाठी कार्डधारकाने स्टेटमेंटमध्ये आलेल्या खरेदीच्या सर्व व्यवहारांची रक्कम भरायलाच हवी. तो व्यवहार रद्द झाल्यानंतर संबंधित रक्कम आयसीआयसीआय बँकेला जेव्हा केव्हा मिळेल त्यावेळी कार्डाच्या खात्यावर (रद्द करण्याचे शुल्क वजा करून) जमा केली जाईल. मात्र, कार्डधारकाने क्रेडिटच्या शुल्काची स्लिप योग्य प्रकारे दिल्यानंतर हे क्रेडिट कार्डाच्या खात्यावर पाठवले जाईल. असे क्रेडिट ठराविक काळात कार्ड खात्यावर आले नाही तर कार्डधारकाने तसे आयसीआयसीआय बँकेला कळवणे आवश्यके आहे.

## XXIII. परदेशात लागणारी शुल्के

कार्डधारक असे जाहीर करतो/ करते की, त्यांना देण्यात आलेले क्रेडिट कार्ड जर परदेशात वापरले गेले तर ते अत्यंत कठोरपणे आरबीआयने घालून दिलेल्या आणि वेळोवेळी बदल केलेल्या देवाणघेवाण नियंत्रण नियमांचे पालन करूनच वापरले जाईल. आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आखलेल्या देवाणघेवाण नियंत्रणाच्या पलीकडे कार्डधारक गेल्यास, कार्डधारक ही बाब ताबडतोब आयसीआयसीआय बँकेला लेखी कळवेल. आरबीआयने सांगितल्यानुसार अशा रितीने निर्माण झालेल्या शुल्कासाठी पासपोर्टवर शिक्का हवा असल्यास, पासपोर्टवर तसा शिक्का मारून घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्डधारकाची आहे. आरबीआयने आखून दिलेल्या आणि सध्या अस्तित्त्वात असलेल्या देवाणघेवाण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात कार्डधारक अपयशी झाल्यास, वेळोवेळी दुरुस्त करण्यात आलेल्या 1999 च्या परकीय व्यवस्थापन कायद्याखाली घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही मागणीवरून कार्डाच्या सुविधेपासून कार्डधारकाला दूर करण्यात येईल. कार्डधारक आपल्या मर्यादेचे उल्लंघन करत असल्याचे आयसीआयसीआय बँकेला समजल्यानंतर, आयसीआयसीआय बँक कोणत्याही प्रकारे आरबीआयची वेळोवेळी लागू झालेल्या मार्गदर्शक तत्त्वांनी आखून दिलेल्या मर्यादांच्या पलीकडे गेल्यामुळे शुल्क अमान्य केल्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी घ्यायला बांधील नाही. परकीय चलनातील सर्व शुल्के ही कार्डधारकाच्या स्टेटमेंटमध्ये भारतीय रुपयांमध्ये दाखवली जातील. परकीय चलनात निर्माण झालेली अशी शुल्के भारतीय रुपयांमध्ये रुपांतरित करताना त्यावेळी अस्तित्त्वात असलेल्या भारतीय रुपयाचा दराने रुपांतरित केली जाईल व हा दर वेळोवेळी अस्तित्त्वात असलेल्या दराच्या योग्य आहे की नाही हा निर्णय आयसीआयसीआय बँक घेईल.

## XXIV बँकेच्या क्रेडिट कार्डावरील रिवॉर्ड्स किंवा बक्षिसे:

**व्याख्या :**

**''स्कीम''** म्हणजे योजना. याचा अर्थ आयसीआयसीआय बँकेची रिवॉर्ड स्कीम किंवा बक्षीस योजना.

**''क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट्स''** याचा अर्थ स्कीम अंतर्गत देण्यात येणारे पॉईंट्स किंवा गुण.

**''डेलिन्क्वेन्ट अकाऊंट''** (उपेक्षित खाते) याचा अर्थ पेमेंट नियमामध्ये उल्लेख केल्यानुसार खात्यामध्ये पेमेंट केलेले नाही.

**''इफेक्टिव्ह डेट''** (लागू तारीख) याचा अर्थ ज्या तारखेपासून स्कीम सुरु होते ती तारीख. ही तारीख आयसीआयसीआय बँक वेळोवेळी कळवत राहील.

**''स्कीम टर्मिनेशन डेट''** (योजना समाप्ती तारीख) याचा अर्थ ज्या तारखेला स्कीम संपते ती तारीख, ही तारीख आयसीआयसीआय बँक वेळोवेळी कळवत राहील.

**''व्हॅलिड चार्ज''** (योग्य शुल्क) याचा अर्थ या स्कीमच्या हेतूसाठी वेळोवेळी कार्डधारकाने कार्डावर विकत घेतलेल्या वस्तू वा सेवा आणि आयसीआयसीआय बँकेने समाविष्ट केलेला इतर कोणतेही शुल्क.

स्कीम ही लागू तारखेपासून अस्तित्त्वात येईल आणि ती केवळ लागू तारखेच्या दिवसापासून वा त्यानंतरच्या तारखेपासून कार्ड्

बाळगणाऱ्या कार्डधारकांसाठीच उपलब्ध असेल. स्कीमच्या लागू तारखेला उपेक्षित खाते असलेल्या कार्डधारकांना ती लागू होणार नाही तसेच स्कीमच्या काळात ज्यांचे खाते उपेक्षित होईल त्यांच्यासाठीही ती लागू होणार नाही.

स्कीमच्या अंतर्गत आयसीआयसीआय बँक कार्डधारकाने निर्माण केलेल्या शुल्काच्या आधारे रिवॉर्ड पॉईंट्स देईल. कार्डधारकाला अतिरिक्त रिवॉड्स पॉइंट्स देण्याचा हक्क केवळ आयसीआयसीआय बँकेचा आहे. कार्डधारकाने मिळवलेले क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉईंट्स कार्डधारकाला दर महिन्याला पाठव्यात येणाऱ्या मासिक स्टेटमेंटमध्ये निर्देशत केले जातील. कार्डधारक आपले जमा झालेले रिवॉर्ड पॉईंट्स हे आयसीआयसीआय बँक वेळोवेळी देत असलेल्या ऑफर्स स्वीकारून त्यासाठी वापरू शकतो/शकते. अशा प्रकारे वापरण्यात आलेले रिवॉर्ड पॉईंट्स हे क्रेडिट कार्डाच्या खात्यात जमा झालेल्या क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉईंट्समधून आपोआप रद्द ठरले जातील. स्कीम संपण्यापूर्वीच्या कोणत्याही तारखेला कार्ड जर मागे घेण्यात आले किंवा रद्द करण्यात आले किंवा कार्ड खाते उपेक्षित खाते ठरले, तर कार्डधारकाच्या खात्यावर जमा केले जाणार नाही. स्कीम संपण्याच्या तारखेच्या अखेरीस, कार्डधारकाच्या खात्यात जमा झालेले क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉईंट्स नंतर सभासदत्व पुन्हा चालू केल्यानंतरही कार्ड खात्यावर जमा झालेले क्रेडिट रिवॉर्ड पॉईंट्स आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी व्याख्या केलेल्या वेळेत वापरले गेले नसतील तर आपोआप रद्द ठरतील. क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट्सचे कॉम्प्युटीकरण अंतीम असेल, ठोस असेल आणि कार्डधारकावर बंधनकारक असेल, तसेच त्याबाबत वाद निर्माण करणे वा त्याबाबत प्रश्न विचारणे याची परवानगी कार्डधारकाला नाही. स्कीमच्या परिणामी वर म्हटल्याप्रमाणे गुण वापरल्याने वा इतर कोणत्या मार्गाने निर्माण झालेले व कार्डधारकावर असलेले कोणतेही कर किंवा इतर दायित्व किंवा शुल्क जी सरकारला किंवा इतर कोणत्या अधिकारात किंवा संस्थेला किंवा सहभागी होणाऱ्या व्यापारी प्रस्थापनेला भरायची असतील, तर ते केवळ कार्डधारकाच्या खात्यावरच असतील. स्कीम संपल्याच्या तारखेनंतर किंवा एका स्कीमच्या बदल्यात दुसरी तशीच वा नवीन स्कीम लागू केल्यानंतर स्कीममध्ये असलेली कोणतीही गोष्ट ही आयसीआयसीआय बँकेवर किंवा सहभागी व्यापारी प्रस्थापनेवर बंधनकारक असल्याचे दाखवता येणार नाही.

स्कीममधील सहभाग हा बंदनकारक नाही आणि सर्वसाधारण परिस्थितीत कार्डाच्या वापरामुळे कार्डधारकाने केलेला खर्च हा आपणहून केलेला आहे असे मानण्यात येईल. सर्वसाधारण परिस्थितीत केलेल्या कार्डाच्या वापराबाबतीत कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही ॲक्शन, क्लेम, मागणी, दायित्व, नुकसान, तोटा, खर्च, शुल्क किंवा खर्चासाठी कार्डधारक आयसीआयसीआय बँकेला जबाबदार धरणार नाही. स्कीममध्ये नमूद केलेल्या अटी या अतिरिक्त असून या अटी व नियमांच्या ऐवजी नाहीत. नियम व अटींव्यतिरिक्त रिवॉर्ड्स पुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या अटी व नियमही लागू असतील. रिवॉर्ड्स पुस्तिका आणि अतिरिक्त नियम व अटी विनंती केल्यावर मिळू शकतील. स्कीममध्ये कोणत्याही क्षणी, कार्डधारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता काही बदल करण्याचा आणि/किंवा भर घालण्याचा, फरक करण्याचा, बदल करण्याचा किंवा सर्व वा अंशत: फरक करण्याचा किंवा स्कीम पूर्णपणे बंद करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक नि:संदिग्धपणे स्वत:कडे राखून ठेवत आहे. स्कीमच्या परिणामी किंवा इतर काही संबंधित मार्गामुळे निर्माण होणारा सर्व वाद हे मुंबईतील न्यायालयांमध्ये /ट्रायब्युनलमध्येच सोडवले जातील.

## XXV. डिस्क्लोजर्स (प्रकटीकरण)

कार्डधारक असे मान्य करतो/ करते व आयसीआयसीआय बँकेला व बँकेच्या ग्रुपमधील कंपन्यांना असे अधिकार देतो/ देते की, त्याच्या/तिच्या अर्जाशी संबंधित सर्व माहिती, डाटा किंवा कागदपत्रे यांची देवाणघेवाण करणे, वाटून घेणे किंवा सर्वच्या सर्व देणे हे बँक आयसीआयसीआयच्या इतर ग्रुप कंपन्यांबरोबर / बँकांबरोबर/ वित्तिय संस्थांबरोबर/ क्रेडिट ब्युरोजबरोबर/ एजन्सींबरोबर/ नियामक अधिकाऱ्यांबरोबर/ वैधानिक मंडळांबरोबर/ कर अधिकाऱ्यांबरोबर/ केंद्रिय माहिती विभागाबरोबर/ आयसीआयसीआय बँकेसारख्या इतर व्यक्तींबरोबर/ त्यांच्या ग्रुप कंपन्यांबरोबर बँकला आवश्यक वाटल्यास/ योग्य वाटल्यास किंवा अशा व्यक्तींची संबंधित माहिती / डाटा उपयोगात आणण्यासाठी किंवा प्रक्रिया करण्यासाठी तसेच प्रक्रिया केलेली माहिती/ डाटा/ उत्पादने इतर बँकांना/वित्तिय संस्थांना/कर्ज पुरवठा करणाऱ्यांना/ अशा व्यक्तींबरोबर नोंदणीकृत झालेल्या वापरकर्त्यांना देण्यासाठी करु शकते आणि ही माहिती वापरल्याबद्दल आयसीआयसीआय बँकेला/ त्यांच्या ग्रुप कंपन्यांना जबाबदार धरले जाणार नाही.

कार्डधारकाने देय असलेल्या कोणत्याही वित्तिय संस्थेचा / सुविधेचा/ वित्तिय क्रेडिट सुविधेचा किंवा व्याजाचा/ शुल्काचा मूळ रकमेचे पेमेंट किंवा रिपेमेंट करताना चूक केल्यास आयसीआयसीआय बँक आणि/किंवा आरबीआय या चुकीचे तपशील जाहीर

करण्याचे वा छापण्याचे नि:संदिग्ध हक्क स्वत:कडे राखून ठेवत असून कार्डधारकाचे नाव/ किंवा त्यांचे संचालन/पार्टनर्स/ पूरक कार्डधारक, जे लागू होत असेल ते, यांची नावे चूक करणारे म्हणून आयसीआयसीआय बँकेला किंवा आरबीआयला आपल्या स्वत:च्या अधिकारात जे योग्य वाटेल त्या मार्गाने वा कोणत्याही माध्यमातून जाहीर करता येऊ शकते. क्रेडिटचा इतिहास/ रिपेमेंटचा रेकॉर्ड आणि/किंवा देय रक्कम देण्याची उलटून गेलेली तारीख याबाबतची कार्डधारकाची माहिती जी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीज (रेग्युलेशन) ॲक्ट, 2005 च्या खाली क्रेडिट इन्फर्मेशन ब्युरोला (आरबीआयने विशेषत्वाने अधिकृत केलेला) स्टेटमेंट्सच्या माध्यमातून देऊ शकते.

क्रेडिट कार्डासाठीच्या अर्जाची स्वीकृती ही कार्डधारकाच्या कर्जाच्या लायकीबाबतच्या बिन विरोधी अहवालांवर आधारित असते. कार्डाच्या खात्यामध्ये झालेली कोणतीही उपेक्षा किंवा कार्डधारकाची कार्डाद्वारे वा इतर माध्यमातून दिली गेलेली क्रेडिटची सुविधा काढून घेतल्याचे आयसीआयसीआय बँक इतर बँकांना वा वित्तिय संस्थांना कळवू शकते. (कार्डधारकाच्या किंवा त्याच्या/तिच्या कुटुंबातील सभासदांच्या क्रेडिट लायकीशी संबंधित) विरोधी अहवाल मिळाल्यास त्याच्या आधारे आयसीआयसीआय बँक, लेखी नोटीस दिल्यापासून 15 दिवसानंतर क्रेडिट कार्ड रद्द करू शकते, अशा वेळी कार्डाच्या खात्यातील संपूर्ण देय रक्कम तसेच कार्डाच्या वापरामुळे निर्माण झालेले इतर शुल्क जे कार्डाच्या खात्यावर अद्याप बिलात दिसले नसेल, ते सर्व ताबडतोब कार्डधारकाला भरणे बंधनकारक आहे. माहिती कुठून मिळाली वा कोणाला दिली त्या बँकेचे वा वित्तिय संस्थेचे नाव कार्डधारकाकडे जाहीर करण्याचे बंधन आयसीआयसीआय बँकेवर नाही.

## XXVI. डेट असाइलनमेंट

कार्डधारकाला कोणतीही सूचना वा हवाला न देता क्रेडिट कार्डावरील शिल्लक असलेली देय रक्कम पूर्णपणे किंवा अंशत: कोणत्याही प्रकारे कोणत्याही तिसऱ्या पक्षाकडे ट्रान्सफर करण्याचा, असाईन करण्याचा वा विकण्याचा हक्क आयसीआयसीआय बँकेकडे राहील. अशा प्रकारची कोणतीही विक्री, असाईनमेंट किंवा ट्रान्सफर मान्य न करता, आयसीआयसीआय बँक कार्डधारकाच्या विरुद्ध कारवाई करण्याची पावले टाकण्यास पूर्णपणे लायक राहील. अशा प्रकारच्या कोणत्याही असाईनमेंट, विक्री किंवा ट्रान्सफरमुळे होणारा खर्च आणि देय व देऊ झालेली रक्कम मिळवण्यासाठी आलेला सर्व खर्च कार्डधारकावर राहील.

## XXVII. मिसलेनियस: इतर:

ज्या कार्डधारकांची खाती आयसीआयसीआयच्या क्रेडिट नियमांनुसार योग्य पद्धतीने राखली गेली आहेत त्या कार्डधारकांना काही विशिष्ट सुविधा, सभासदत्व आणि सेवा बँकेला योग्य वाटतील त्या अटी व नियमांनुसार देऊ करम्याचा हक्क बँक राखून ठेवत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता आणि कार्डधारकावर कोणतेही दायित्व न ठेवता ते बंद करण्याचा तसेच अशा प्रकारचा फायदा रद्द करण्याचा आणि त्याचे शुल्क रद्द करण्याचा किंवा कमी करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे. या अटी व नियमांचे उल्लंघन केल्यामुळे सभासदत्व रद्द झाल्यास आपोआप अशा सर्व सुविधा व सेवाही रद्द समजल्या जातील. अशा सुविधा, सभासदत्व किंवा सेवा, मग त्या आयसीआयसीआय बँकेने दिलेल्या असोत वा व्यापारी प्रस्थापनेने किंवा एखाद्या तिसऱ्या पक्षाने, त्या कार्यान्वित करत असताना कामगिरीमध्ये खराबी आल्यास वा खोट आल्यास किंवा त्यापुढे कामगिरी न झाल्यास, आयसीआयसीआय बँक कोणत्याही परिस्थितीत कार्डधारकाला जबाबदार राहणार नाही.

आपल्या अर्जावर कार्डधारकाने दिलेली माहिती तसेच पाहणी करताना, बाह्य स्त्रोतांमार्फत मिळालेली माहिती ज्यात ग्राहक अहवालही असू शकतात, ती आयसीआयसीआय बँक/संलग्न कंपन्या करत असलेल्या मार्केटिंगच्या कामासाठी वापरण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे. या माहितीचा उपयोग करून आयसीआयसीआय बँक एक मेलिंगची यादी विकसित करू शकते जिचा उपयोग आयसीआयसीआय बँक कार्डधारकांसाठी मार्केटिंगच्या ऑफर्सवर काम करत असलेल्या कंपन्यांना वापरता येऊ शकते.

कार्डावर देऊ केलेले फायदे, वैशिष्ट्ये आणि धोरणे यात वेळोवेळी बदल करयाचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत असून अशा प्रकारच्या बदलांची माहिती कार्डधारकाला बँकेला योग्य वाटेल त्या माध्यमातून देण्यात येईल. अशा प्रकारे केले गेलेले बदल हे कार्डधारकाने आपले कार्ड बदल करण्याच्या तारखेपूर्वी रद्द करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेकडे दिले नाही तर कार्डधारकावर बंधनकारक राहतील.

कार्डधारकाच्या कार्डखात्यावर नोंद झालेल्या व्यवहारांचे सर्व तपशील क्रेडिट रेफरन्स एजन्सीज, कर्ज देणारे आणि/किंवा इतर एजन्सीजना दिले जाऊ शकतात ज्या द्वारे त्यांना कार्डधारकाने आणि/किंवा त्याच्या कुटुंबातील सभासदांनी केलेल्या अर्जाची छाननी करता यावी आणि गैरव्यवहार टाळता यावा. सेट ऑफसाठी देण्यात आलेले सर्वसाधारण हक्क आणि कायद्याने वा इतर कोणत्याही कराराद्वारे देण्यात आलेल्या हक्कांखेरीज, आयसीआयसीआय बँक, कोणतीही पूर्वसूचना न देता कार्डखात्यावरील देय रक्कम कार्डधारकाच्या आयसीआयसीआय बँकेत असलेल्या वा बँकेच्या ग्रुप कंपनीजमध्ये असलेल्या दुसऱ्या खात्याबरोबर किंवा खात्यांबरोबर एकत्रित किंवा जोडून घेऊ शकते आणि अशा इतर खात्यामधले किंवा खात्यांमधले पैसे सेटऑफ करून वा ट्रान्सफर करून कार्डधारकाने त्याच्या कार्ड खात्यावरील दायित्व पूर्ण करण्याच्या दिशेने आपले समाधान होईल अशा पद्धतीने घेऊ शकते.

कार्डधारकाने आपल्या संपर्कासाठी कार्डासाठीच्या अर्जात दिलेल्या आपल्या नावात, पत्त्यामध्ये, संपर्क नंबरामध्ये आणि ईमेल आयडीमध्ये बदल झाल्यास ताबडतोब कळवेल. पत्त्यामधील बदल आयसीआयसीआय बँकेच्या निदर्शनास आल्यास तसा बदल आपल्या कागदपत्रांमध्ये करून घेयाचा हक्क आयसीआयसीआय बँक स्वत:कडे राखून ठेवत आहे. संपर्कासाठी आपला योग्य पत्ता आयसीआयसीआय बँकेला कळवण्यात आला आहे की नाही हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी कार्डधारकाची आहे आणि चुकीच्या पत्त्यामुळे कार्डधारकाचे नुकसान झाल्यावर वा त्यावर दायित्व आल्यास त्याची कोणतीही जबाबदारी आयसीआयसीआय बँक स्वीकारत नाही.

कार्डधारकाने वेळोवेळी वापरलेल्या सुविधा/सेवा देताना आयसीआयसीआय बँकेने वा बँकेशी संलग्न संस्थांनी घालून दिलेल्या सर्व अटी व नियम पाळणे कार्डधारकाला बंधनकारक आहे. असे सर्व व्यवहार जे दूरसंचारासाठी दिलेल्या सुविधांमार्फत केलेले आहेत किंवा त्यांच्या परिणामी झालेले आहेत, यात इंटरनेट, वर्ल्ड वाईड वेब, इलेक्ट्रॉनिक डाटा इंटरचेंज, कॉल सेंटर्स, टेलिसर्व्हिस ऑपरेशन (यात स्वर, व्हिडिओ, डाटा किंवा या सर्वांचे मिश्रण यांचा समावेश होतो) किंवा इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर, ऑटोमेटेड मशीन्स नेटवर्क यांच्या द्वारे केलेले आहेत किंवा दूरसंचाराच्या इतर कोणत्याही माध्यमातून केलेले आहेत, आणि आयसीआयसीआय बँकेतर्फे किंवा बँकेने वा संलग्न संस्थांनी ते संमत केलेले आहेत, अशा देऊ केलेल्या सुविधा/सेवा यांच्या संदर्भात आयसीआयसीआय बँक वा तिच्या संलग्न संस्थांनी अशा सुविधा/सेवांसाठी वेळोवेळी आखून दिलेल्या अटी व नियमांचे पालन करून केलेले व्यवहार हे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आणि योग्य असतील.

## XXVIII. सेटऑफ

(i) कार्डधारकाच्या कार्डखात्यावरील दायित्वाच्या परतफेडीसाठी आयसीआयसीआय बँक व ग्रुप कंपन्या यांना ते सेटऑप करण्याचे वा तारण ठेवण्याचे सर्वोच्च अधिकार असतील, मग ते तारण कार्डधारकाच्या आयसीआयसीआय बँकेतील आणि/किंवा ग्रुप कंपन्यांमधील, स्वत:च्या नावावर वा जॉईंट नावावर/ नावांवर असतील आणि कोणत्याही ठेवी वा सिक्युरिटिज वा बॉण्ड्स आणि इतर सर्व मालमत्ता, कागदपत्रे आणि संपत्ती जी आयसीआयसीआय बँक आणि/किंवा ग्रुप कंपनीच्या नियंत्रणाखाली असेल (सिक्युरिटी म्हणून असो किंवा कार्डधारकाने कोणत्याही क्षमतेमध्ये केलेला करार वा करण्यात येणारा करार असो) अशा ठेवींवर कोणत्याही प्रकारचे वर्तमानात किंवा भविष्यात तारण असेल (यात फिक्स्ड डिपॉझिट्सचाही समावेश आहे) तरीही तसा हक्क आयसीआयसीआय बँकेला आहे. आयसीआयसीआय बँक आणि ग्रुप कंपन्या यांना कार्डधारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता, कार्डधारक आयसीआयसीआय बँक आणि/ किंवा ग्रुप कंपन्यांना देय असलेली रक्कम वळती करून घेण्याचा अधिकार आहे (मग ती रक्कम थेट असो किंवा आनुषांगिक असो किंवा प्राथमिक असो किंवा दुय्यम असो किंवा जाईंट आणि/ किंवा अनेक असो) याअंतर्गत किंवा कोणत्याही कागदपत्रांअंतर्गत/ करारांतर्गत, कोणतीही ठेव वा ठेवी आणि/ किंवा कार्डधारकाच्या आयसीआयसीआय बँकेत आणि/ किंवा ग्रुप कंपन्यांमध्ये असलेल्या खात्यात/ खात्यांत शिल्लक असलेली ररकम सेट ऑफ करून ॲडजस्ट करण्याचा अधिकार बँकेला आहे, मग अशा खात्यात /खात्यांत असलेली शिल्लक ही कर्जाच्या चलनामध्ये नसली तरी हरकत नाही. आयसीआयसीआय बँक व ग्रुप कंपन्यांच्या या हक्कावर कार्डधारकाचे दिवाळे वाजले, मृत्यू झाला किंवा व्यवसाय गुंडाळला गेला तरीही गदा येत नाही. अशा जॉईंट खात्यांच्या धारकांनी निर्माण केलेला वाद/आक्षेप मिटवण्याची संपूर्ण जबाबादीर व दायित्व कार्डधारकाचे असले.

ii) वर उल्लेख केलेल्या हक्कांव्यतिरिक्त किंवा इतर कोणत्याही हक्कांखेरीज आयसीआयसीआय बँक आणि ग्रुप कंपन्या कोणत्याही क्षणी कायद्याच्या आधारे किंवा कराराच्या आधारे किंवा इतर मार्गांनी कोणत्याही क्षणी, आयसीआयसीआय बँकेला खालील गोष्टींचे

अधिकार राहतील: अ) कार्डधारकाचे आयसीआयसीआय बँकेच्या आणि/ किंवा ग्रुप कंपन्यांच्या कोणत्याही शाखेत असलेले खाते किंवा दायित्व एकत्र करणे. ब) काकार्डधारकाची कोणतीही सिक्युरिटी किंवा संपत्ती जी आयसीआयसीआय बँकेकडे आहे ती सार्वजनिक किंवा खाजगी विक्रीद्वारे किंवा इतर मार्गांनी, कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया न करता विकता अथवा तिची विल्हेवाट लावता येणे आणि त्यापासून मिळालेल्या रकमेमधून आयसीआयसीआय बँक आणि/ किंवा ग्रुप कंपनीला कार्डधारक देय असलेली रक्कम अशा विक्रीसाठी वा विल्हेवाट लावण्यासाठी आलेल्या खर्चासकट कापून घेणे. आणि क) क्रॉस करन्सीच्या (वेगवेगळ्या चलनांच्या) सेटऑफप्रकरणी एका चलनाचे रूपांतर दुसऱ्या चलनात करताना त्याचा दर केवळ आयसीआयसीआय बँक आणि/ किंवा ग्रुप कंपन्यांनीच ठरवणे.

## XXIX. आयअश्युअर सर्व्हिस

''आयअश्युअर सर्व्हिस'' ही वर्गणीआधारित सेवा असून त्याद्वारे आयसीआयसीआय बँक आपल्या निवडक कार्डधारकांना पैसे भरून सहलीसाठीची ऑफर देते ज्यात क्रेडिटचा व्याजरहित काळ हा पेमेंट भरण्याच्या तारखेपासून अतिरिक्त 75 (पंचाहत्तर) दिवसांनी वाढवलेला असतो ज्यामुळे कार्डामध्ये बिलातली रक्कम भरण्यासाठी काही विशिष्ट आधीच ठरवण्यात आलेले घटक असतात जे आयसीआयसीआय बँकेने आपल्या कार्डधारकाला कळवलेले असतात.

**''आयअश्युअर सबस्क्रिप्शन किट''** याचा अर्थ आयअश्युअर सेवेमद्ये कार्डधारकाने स्वत:चे नाव नोंदवल्यानंतर आयअश्युअर सेवेविषयी सर्व तपशील कार्डधारकाला कळवण्यासाठी साधलेला संपर्क.

आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट नियमांचे पालन करून आपले खाते चांगल्या पद्धतीने कार्यरत ठेवणाऱ्या कार्डधारकांना वित्तिय संकटाच्या काळात, आयअश्युअर सबस्क्रिप्शन किटमध्ये नोंदवण्यात आलेल्या काही ठराविक घटना घडल्यास आपल्या इच्छेनुसार काही विशिष्ट सुविधा ऑफर करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

ज्या कार्डधारकाला आयअश्युअर सेवा द्यायची आहे त्याला/ तिला आयसीआयसीआय बँक तशी माहिती कार्डधारकाच्या बिलिंगच्या पत्त्यावर पाठवेल किंवा कार्डधारकाने दिलेल्या नोंदणीकत फोन नंबरवर संपर्क साधून देईल किंवा आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही मार्गाने कळवेल. या संबंधीचा संपर्क साधल्यानंतर, आयअश्युअर सेवा हवी असल्यास, कार्डधारकाला आयअश्युअर सेवेसाठी स्वत:चे नाव नोंदवावे लागेल जे त्याला/ तिला आयसीआयसीआय बँकेने संपर्क साधून कळवले असेल त्या मार्गाने आयसीआयसीआय बँकेकडे नोदवावे लागेल. नावाची नोंद झाल्यानंतर कार्डधारकाच्या बिलिंग पत्त्यावर आयअश्युअरन्स सबस्क्रिप्शन किट पाठवले जाईल. नाव नोंदवल्यानंतर 20 (वीस) दिवसांच्या आत जर कार्डधारकाला आयअश्युअरन्स सबस्क्रिप्शन किट मिळाले नाही तर कार्डधारकाने तसे आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केअर सेंटरला तसे कळवणे आवश्यक आहे, जे न केल्यास आयअश्युअर सेवेची वर्गणी ही रद्द ठरवली जाईल.

आयअश्युअर सेवेचा लाभ कार्डधारकाला तो /ती ज्या नोंदवलेल्या विशिष्ट घटनेसाठी आयअश्युअर सेवेअंतर्गत पैसे भरून सहलीची सेवा सक्रिय करत आहे ती घटना घडण्याच्या तारखेच्या दिवशी असलेल्या संपूर्ण देय रकमेच्या कमाल रूपये 50,00 पर्यंतच घेता येईल. मात्र, घटनेची तारीख आणि आयअश्युअर सेवेच्या सक्रियतेची तारीख (दोन्ही दिवस समाविष्ट) यांच्या मधल्या काळात कार्डधारकाने काही अतिरिक्त खर्च केल्यास ती रक्कम आयअश्युअर सेवेअंतर्गत पैसे भरून सहलीची सेवा सक्रिय होण्यापूर्वी ताबडतोब कार्डधारकाला भरावी लागेल.

नाव नोंदवल्यानंतर, कार्डधारकाला आयअश्युअर सेवेसाठीचे मासिक पद्धतीने बिल पाठवले जाईल जे स्टेटमेंट दिसून येईल. वर्गणीच्या काळात कधीही कार्डधारक या सेवेतून बाहेर पडायचे असल्यास तसे आयसीआयसीआय बँकेच्या 24 तास चालणाऱ्या कस्टमर केअर सेंटरला कोणत्याही वेळी कळवू शकतो/शकते. मात्र, अशावेळी वर्गणी रद्द होणे आणि त्याचे शुल्क बंद करणे या गोष्टी या महिन्याच्या किंवा त्यानंतरच्या महिन्याच्या 15 तारखेला, जी तारीख आधी येईल ती, जे स्टेटमेंट केले जाईल त्यापासून लागू होईल. आयअश्युअर सेवा सक्रिय करण्यासाठी कार्डधारकाकडून लागणाऱ्या कागदपत्रांची माहितीही आयअश्युअरन्स सबस्क्रिप्शन किटमध्ये दिली जाईल. आयअश्युअर सेवा सक्रिय केल्यानंतर, कार्डाचा / कार्डखात्याचा वापर हा आयअश्युअर सेवेचा लाभ घेताना देय झालेली रक्कम पूर्ण भरेपर्यंत मर्यादित राहील.

आयअश्युअर सेवेच्या काळाचा विस्तार संपल्यानंतर, कार्डधारकाला संपूर्ण देय रकमेचा भरणा ताबडतोब करावा लागेल. कार्डधारकाने तसे न केल्यास, अशा आयअश्युअर सेवेच्या संपूर्ण काळासाठीचे व्याज त्या शिल्लक रकमेवर लावले जाईल.

आयसीआयसीआय बँक, आपल्या स्वत:च्या मर्जीने, वर्गणी चालू ठेवण्यासाठी शुल्क आकारणीमध्ये बदल करू शकते किंवा त्यानंतर कार्डधारकाला आयअश्युअर सेवा न देण्याचा निर्णय घेऊ शकते जो कार्डधारकाच्या आयसीआयसीआय बँकेच्या कागदपत्रांमध्ये नोंदवलेल्या बिलिंग पत्त्यावर कळवू शकते.

## XXX सेट्लमेंट ऑफ डिसप्युट्स (वादाचा निचरा)

सर्व वाद हे मुंबई न्यायालयाच्या अखत्यारितच सोडवले जातील.

## XXXI. या अटी व नियम बदलणे

कोणत्याही अटी आणि नियम बदलण्याचा किंवा त्याला पूरके जोडण्याचा अधिकार पूर्णपणे आयसीआयसीआय बँकेकडे आहेत, तसेच कार्डावर देऊ केलेली कोणतीही वैशिष्ट्ये आणि फायदे, ज्यात कोणत्याही मर्यादेशिवाय, अस्तित्त्वात असलेल्या शिलकीवर परिणाम करणारे बदल, व्याजात बदल किंवा मोजण्याच्या दरामध्ये वा पद्धतीमध्ये कोणत्याही वेळी बदल करण्याचा अधिकारांचा समावेश आहे. अशा सुधारित अटी व नियमांखाली येणारी सर्व शुल्के व इतर देय रक्कम कार्डावरील सर्व रक्कम पूर्णपणे भरून होईपर्यंत भरणे कार्डधारकाला बंधनकारक आहे. सुधारित अटी आयसीआयसीआय बँक इन्फीनिटीवर होस्ट करून वा आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल अशा कोणत्याही मार्गाने कळवू शकते. कार्डधारकाने नियमितपणे या अटी व नियमांचे जबाबदारीने परीक्षण करणे आवश्यक असून यात इन्फीनिटीवर पोस्ट केलेल्या सुधारित अटी व नियमांचाही समावेश आहे आणि कार्डाचा वापर चालू राहणे याचा अर्थ कार्डधारकाने या सुधारित अटी व नियम मान्य केले असल्याचे गृहित धरले जाते. अटी व नियमांमध्ये होणारे कोणतेही बदल (व्याजावरील शुल्क व दर वगळता) कार्डधारकाला ते लागू होण्याच्या एक महिना आधी वर उल्लेख केलेल्या पद्धतींच्या माध्यमातून कळवले जातील.

## XXXII. नोटीस

या अटी व नियमांखालील किंवा संबंधित सर्व नोटीसा किंवा इतर संपर्क, ज्यात कार्डधारकाकडून देय असलेल्या सर्व रकमेचाही समावेश असेल, त्या आयसीआयसीआय बँक लिमिटेड, आयसीआयसीआय बँक फोन बँकिंग सेंटर, पी.ओ.बॉक्स नंबर 20, बंजारा हिल्स, पी.ओ. हैदराबाद 500 034, भारत या पत्त्यावर लेखी देणे आवश्यक आहे आणि वेगळा उल्लेख केलेला नसल्यास पत्र वा फॅक्स पाठवून त्या घ्याव्या लागतील. अशी कोणतीही नोटीस किंवा इतर संपर्क परिणामकारक समजले जातील; नोटीस किंवा संपर्कासाठी 1) कार्डधारकाचा पत्ता किंवा नक्कल पाठवण्याचा नंबर जो आयसीआयसीआय बँकेच्या कागदपत्रांमध्ये नोदवलेला असेल आणि ज्यावर नोटीसा/संपर्क वा माहिती पाटवली जात असेल (जो अर्जावर असेल) आणि 2) आयसीआयसीआय बँकेच्या झोनल/ विभागीय/ शाखा/ कार्यालयाचा पत्ता किंवा फॅक्सचा क्रमांक जो कार्डधारकाने आणि आयसीआयसीआय बँकेने एकमेकांना दिलेला असेल त्यावरच संपर्क साधला जावा. आपल्या संपर्काच्या पत्त्यामध्ये, तपशीलामध्ये, नोटीस पाठवण्यासाठी/ पत्रव्यवहार करण्यासाठी अर्जात दिल्या गेलेल्या पत्त्यामध्ये किंवा कार्डधारकाने शेवटचा दिलेल्या पत्त्यामध्ये झालेला बदल कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेला लेखी कळवला नाही तर अशी नोटीस 'दिली नाही', असे म्हणून आयसीआयसीआय बँकेकडे परत आली तरीही ती कार्डधारकासाठी योग्य आणि पुरेशी सेवा असल्याचे समजले जाईल. कार्डधारकाच्या राहण्याच्या किंवा कामाच्या विभागात उपलब्ध असलेल्या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली नोटीस ही ती छापून आल्याच्या तारखेपासून कार्डधारकाला मिळालेली पुरेशी नोटीस असल्याचे समजले जाईल, मात्र, वर्तमानपत्रात आयसीआयसीआय बँकेच्या विरुद्ध देण्यात आलेली नोटीस ही आयसीआयसीआय बँकेने स्वीकृती दाखवल्याशिवाय लागू झाल्याचे समजले जाणार नाही.

## XXXIII. जागतिक भारतीय क्रेडिट कार्ड नियम

हे नियम (एक वा अनेक) केवळ जागतिक भारतीय क्रेडिट कार्ड (ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्ड) वापरत असलेल्या कार्डधारकालाच लागू असतील. क्रेडिट कार्डाच्या वापरासाठी असलेल्या इतर अटी व नियमांखेरीज ('अटी व नियम') लागू होणाऱ्या इतर अटी व नियम असतील. या नियमांचा जेथे इतर अटी व नियमांशी संघर्ष होईल तेव्हा हे नियम लागू असतील.

जागतिक भारतीय क्रेडिट कार्डावर रोख रक्कम काढण्याची परवानगी नाही. जागतिक भारतीय क्रेडिट कार्डावर रोख रकमेची मर्यादा दिली जाणार नाही.

पेमेंट करण्याच्या तारखेला कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेला संपूर्ण देय रक्कम द्यायची आहे. जागतिक भारतीय क्रेडिट कार्डावर एमएडीच्या पेमेंटची सुविधा लागू केलेली नाही. जागतिक भारतीय क्रेडिट कार्डाचे पेमेंट हे ईसीएस पद्धतीनेच केले जाईल.

## XXXIV. ईएमआय क्रेडिट कार्ड नियम

हे नियम (नियम) केवळ ईएमआय कार्ड वापरणाऱ्या कार्डधारकांनाच लागू आहेत. क्रेडिट कार्डाच्या वापरासाठी असलेल्या इतर अटी व नियमांखेरीज ('अटी व नियम') लागू होणाऱ्या इतर अटी व नियम असतील. या नियमांचा जेथे इतर अटी व नियमांशी संघर्ष होईल तेव्हा हे नियम लागू असतील.

1. ईएमआय कार्डाच्या बाबतीत, ईएमआय कार्डधारक कार्डाअंतर्गत असलेल्या सर्व देय रकमेचे पेमेंट स्टेटमेंटमध्ये दर्शवल्यानुसार इक्वेटेड मन्थली इन्स्टॉलमेंट्स (ईएमआय–समान मासिक हप्ते) मध्येच करेल. अशी देय झालेली किंवा ड्यू झालेली ईएमआयची रक्कम (ईएडी) ही आयसीआयसीआय बँकेने कार्डधाराकला दिलेल्या खरेदीच्या मर्यादेवर जी आयसीआयसीआय बँकेने कार्डधारकाला, इंटरआलिया, स्टेटमेंटमध्ये दर्शवलेली असेल त्यावर आधारित असेल.

ईएडमध्ये खरेदीची रक्कम, व्यवहारासाठीचे शुल्क आणि व्याज यांचा समावेश असले. व्यवहाराच्या दिवसापासून व्यवहाराच्या रकमेवर व्याज लावले जाईल. पुढे, हा ईएडी स्टेटमेंटमध्ये दर्शवलेल्या ड्यू तारखेपर्यंत भरला गेला नाही तर, सेवाशुल्क आणि लेट पेमेंट शुल्क कार्डधारकाला लावले जाईल. मागील स्टेटमेंट्मध्ये त्या ईएडीमध्ये जमा केली जाईल. मात्र, ईएडीपेक्षा अधिक पेमेंट केले गेल्यास टॅरीफ ॲनेक्शचरमध्ये नमूद केल्यानुसार कार्डधारकाला त्यावर विशिष्ट शुल्क भरावे लागेल. हे अतिरिक्त पेमेंट पुढच्या महिन्यातील ईएमडीमधून वजा केले जाईल व तसे ते स्टेटमेंटमध्ये प्रतिबिंबित होईल. पुढे, कोणत्याही ठराविक महिन्याच्या शेवटी, कार्डधारकाने भरायची रक्कम ही ईएडीपेक्षा कमी असेल तर कार्डधारकाला जेवढी रक्कम भरणे आवश्यक आहे तेवढीच भरम्याची गरज असले.

2. फी व शुल्क यांची आकडेवारी खाली दर्शवण्यात आली आहे. उदाहरणार्थ, कार्डधारकाकडे ईएमआय कार्ड आहे ज्याचा ईएडी दर महिन्याला रुपये 2000 इतका असून त्यावरील खरेदीची मर्यादा रुपये 48,000 इतकी आहे आणि (मासिक) व्याज 1.49 % एवढे आहे. स्टेटमेंटची तारीख दर महिन्याच्या 20 तारखेची आहे आणि ड्यू डेट म्हणजे पैसे भरण्याची तारीख दर महिन्याची 7 तारीख आहे.

5. जानेवारी 06 या दिवशी कार्डधारकाने रुपये 10,000/– एवढ्या एकूण रकमेची खरेदी केली. या व्यवहारावर रु. 149/– एवढे शुल्क लावले जाईल. 20 जानेवारी 2006 या दिवशी स्टेटमेंट बनवले जाईल व त्यातील क्लोजिंग बॅलन्स, शेवटची देय शिल्लक रक्कम ही रु. 10224.61/– एवढी असेल. यात रु. 75.61/– रुपये या 5 जानेवारी 06 ते 20 जानेवारी 06 या काळातील खरेदीवर लावण्यात आलेल्या व्याजाचाही समावेश असेल. कार्डधारकाला 7 फेब्रुवारी 2006 या दिवशी रु. 2000 एवढी ईएडीची रक्कम भरावी लागेल. 10 फेब्रुवारी 2006 या दिवशी कार्डधारकाने रु. 6000/– एवढ्या रकमेची खरेदी केली. या व्यवहारावर रु. 149/– एवढे व्यवहार शुल्क लावले जाईल. कार्डधारकाने 7 फेब्रुवारी 2006 या दिवशी रु. 2000 एवढी रक्कम भरली. 20 जानेवारी 2006 ते 7 फेब्रुवारी 2006 या काळासाठी 10224.61 एवढ्या रकमेवर व्याज लावले जाईल आणि 7 फेब्रुवारी 2006 ते 20 फेब्रुवारी 2006 या काळासाठी 8224.61 एवढ्या रकमेवर व्याज लावले जाईल. रु. 6000/– च्या खड़ेदीवरही 10 फेब्रुवारी 06 ते 20 फेब्रुवारी 06 या काळासाठी व्याज लावले जाईल. एकूण 169.97/– एवढे व्याज 20 फेब्रुवारी 06 या दिवशी बनवण्यात येणाऱ्या स्टेटमेंटमध्ये दिसेल व 20 फेब्रुवारी 06 या दिवशीचा यातील क्लोजिंग बॅलन्स रु. 14543.58 एवढा असेल. कार्डधारकाला 7 मार्च 2006 या दिवशी रु. 2000 एवढी ईएडीची रक्कम भरावी लागेल.

पेमेंट करण्यास उशीर झाला तर लेट पेमेंट शुल्क लावले जाईल. ईएडीच्या वर केलेल्या कोणत्याही अतिरिक्त पेमेंटवर ठराविक शुल्क आकारले जाईल. शुल्काविषयीचे तपशील जाणून घेण्यासाठी कृपया टॅरिफ ॲनेक्शचर पहा. कार्डधारकाने केलेल्या कोणत्याही

अधिकच्या खरेदीमुळे ईएडीमध्ये वाढ होणार नाही, मात्र क्लोजिंग बॅलन्सच्या रकमेमध्ये व रिपेमेंटच्या काळामध्ये त्या त्या प्रमाणात वाढ होईल. हीच गोष्ट खाली तक्त्यामध्ये दर्शवण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| **ईएमआय कार्ड : उत्पादनाचा तपशील** | **ईएडी** | **2000** |
| | **खरेदीची मर्यादा** | **48,000** |
| | **व्याज** | **1.49%** |
| | **स्टेटमेंटची तारीख** | **दर महिन्याची 20** |
| | **ड्यू डेट** | **दर महिन्याची 7** |

| **पहिला महिना 1** | | **दुसरा महिना** | |
|---|---|---|---|
| ओपनिंग बॅलन्सची रक्कम | 0 | ओपनिंग बॅलन्सची रक्कम | 10224.61 |
| व्यवहाराची रक्कम (5 जाने. 06) | 10,000 | व्यवहाराची रक्कम (10 फेब्रु 06) | 6000 |
| व्यवहाराचे शुल्क (5 जाने. 06) | 149 | व्यवहाराचे शुल्क (10 फेब्रु. 06) | 149 |
| व्याज | 75.61 | व्याज | 169.97 |
| क्लोजिंग बॅलन्स रक्कम | 10224.61 | क्लोजिंग बॅलन्स रक्कम | 14543.58 |
| ईएमआय रक्कम देय | 2000 | ईएमआय रक्कम देय | 2000 |
| ईएमआय रक्कम भरली | 2000 | ईएमआय रक्कम भरली | 2000 |

कार्डखात्यावर आयसीआयसीआय बँक एक खरेदी मर्यादा आखून देईल जी कोणत्याही वेळी ओलांडता कामा नये. मात्र, एकूण देय रक्कम ही खरेदी मर्यादेच्या बाहेर गेली, तर या अधिक झालेल्या रकमेवर अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल. शुल्काविषयीचे तपशील जाणून घेण्यासाठी कृपया टॅरिफ ॲनेक्शचर पहा.

ईएमआय कार्डावर एएमएडीचे पेमेंट करण्याची सुविधा लागू नाही.

3. पूरक कार्डाची सुविधा आणि व्यापारी आधारित प्रस्थापनेमध्ये हप्त्याची योजना ईएमआय कार्डावर लागू नाही.

## XXXV. कॉरपोरेट क्रेडिट कार्डाचे नियम

हे नियम (नियम) कॉरपोरेट क्रेडिट कार्ड वापरणाऱ्या कार्डधारकांनाच लागू असतील. क्रेडिट कार्डाच्या वापरासाठी असलेल्या इतर अटी व नियमांखेरीज ('अटी व नियम') लागू होणाऱ्या इतर अटी व नियम असतील. या नियमांचा जेथे इतर अटी व नियमांशी संघर्ष होईल तेव्हा हे नियम लागू असतील.

कॉरपोरेट क्रेडिट कार्ड हे कार्डधारकाचे व्यक्तिगत दायित्व असलेले कार्ड (सीसीआयएल–कॉरपोरेट काड विथ इन्डिव्हिज्युअल लायबलिटी) किंवा कॉरपोरेट दायित्व असलेले कॉरपोरेट कार्ड (सीसीसीएल–कॉरपोरेट कार्ड विथ कॉरपोरेट लायबलिटी) असू शकते ज्यात कार्डधारक आणि कंपनी यांचे एकत्रित दायित्व असू शकते.

आयसीआयसीआय बँक बँकेने संमत केलेल्या कार्डधारकांना कार्ड देईल. खास करार झाला नसेल तर सर्वसाधारणपणे कार्डावर कार्डधारकांचे व कंपनीचे नाव एम्बॉस केलेले असेल. खाली दिलेल्या कॅन्सलेशन कलमानुसार कार्ड रद्द करण्याची वेळ येईपर्यंत आयसीआयसीआय बँक रिन्युअल किंवा रिप्लेसमेंट कार्ड देत राहील.

**व्याख्या :**

कार्ड खाते म्हणजे कंपनीच्या नावाने उघडलेले खाते जे आयसीआयसीआय बँक कॉरपोरेट क्रेडिट कार्डाच्या वापराच्या हेतूने इथे दिलेल्या अटी व नियमानुसार चालवते.

'सेवा' किंवा सर्व्हिसेस हणजे व्हिसा इन्फर्मेशन मॅनेजमेंट सर्व्हिसेस, ज्यात डाटा सेवा आणि कॉपीराइट असलेल्या व्हिसा इन्फर्मेशन सोर्स ('व्हीआयएस'), व्हिसा मल्टीनॅशनल रिपोर्टिंग ('व्हीएमआर') व्हिसा ट्रॅव्हल अकाउंट मॅनेजर ('व्हीटीएएम') आणि एनहॅन्सड्

डाटा सर्व्हिसेस ('ईडीएस') या नावाने ओळखले जाणारे ऑनलाईन काम आणि तिथे होणाऱ्या सर्व सुधारणा आणि अपडेट्स, ज्यात जोडलेली कागदपत्रे फाईल, डाटा आणि सामुग्री यांचाही समावेश आहे.

''सर्व्हिसेस'') म्हणजे सेवा याचा अर्थ व्हिसा इन्फर्मेशन मॅनेजमेंट सर्व्हिसेस (व्हिसा माहिती व्यवस्थापन सेवा), ज्यात डाटा सर्व्हिसेस आणि ऑनलाईन कॉपीराईटेड वर्क ज्याला व्हिसा इन्फर्मेशन सोर्स (व्हीआयएस) असे अहटले जाते, व्हिसा मल्टीनॅशनल रिपोर्टिंग (व्हीएमआर), व्हिसा ट्रॅव्हल अकाऊंट मॅनेजर (व्हीटीएएम) आणि एनहान्स्ड डाटा सर्व्हिसेस (ईडीएस) यांचा समावेश असेल तसेच, संबंधित सर्व अपडेट्स आणि अपग्रेड्स असतील ज्यात सोबतची कागदपत्रे, फाईल्स, माहिती आणि सामुग्री यांचा समावेश असेल.

## व्हिसा इन्फर्मेशन मॅनेजमेंट सर्व्हिसेस (सर्व्हिसेस– सेवा)

कंपनीने आणि कार्डधारकाने ही सेवा स्वीकारली असल्यास, कंपनी आणि कार्डधारक या सेवेचा वापर करतील, मात्र तो वापर आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी कळवलेल्या नियम व अटींवर लागू होईल ही सेवा घेणाऱ्या कार्डधारकाला/ कानां लागू होत असलेल्या सर्व कायद्यांची माहिती देणारी नोटीस, ज्यात एन्हान्सड डाटाचा समावेश असेल व तो कंपनीला मिळू शकतो, मिळालेली आहे याची काळजी कंपनीला घ्यावी लागेल. अहवालांच्या फैलावासाठी, फाईली काढण्यासाठी किंवा सेवेच्या कोणत्याही हेतूसाठी डाऊनलोड केलेला कोणताही डाटा वा माहिती डाऊनलोड केली गेल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीची व कार्डधारकाची राहील.

सेवेच्या उपयोगामुळे उद्‌भवणारे कोणतेही दावे किंवा दायित्व यांच्यासाठी आयसीआयसीआय बँकेला कंपनी आण कार्डधारक जबाबदार धरणार नाहीत. या कलमाच्या हेतूसाठी, दाव्यांमध्ये वैयक्तिक दुखापत, संपत्तीचा तोटा, नुकसान (ज्यात नफ्यातला तोटा किंवा बचती, अप्रत्यक्ष, परिणामी, विशेष, अनुकरणीय, दंडात्मक किंवा घटनात्मक यांचा समावेश होतो) तोटे, दंज, फाईन, दावे, खर्च आ(वकिलाच्या फीसहित) इतर खर्च यांचा समावेस होतो. (क्लेम–दावा). दायित्वाचा अर्थ कोणत्याही तत्त्वाअंतर्गत किंवा सक्रियतेमुळे, कायद्याने किंवा समभागाने, ज्यात समावेश आहे, कोणत्याही मर्यादेशिवाय, करार वा दिवाणी गुन्हा, ज्यात समावेश आहे दुर्लक्षिततेचा, मग संबंधित पक्षाला असे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे सांगितलेले असले तरी आणि त्यात इतरांच्या बौद्धिक संपत्तीच्या हक्कांचा भंग केल्याने र्मिाण झालेल्या दायित्वाचाही समावेश असले किंवा तिसऱ्या पक्षाने दावे केलेले दायित्व (दायित्व) असेल. कंपनी आणि कार्डधारकाने वापरलेल्या अशा सेवा या सर्व वेळी आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या व्हिसा इंटरनॅशनल ऑपरेटिंग रेग्युलेशन्सला बांधील असतील. कार्डधारक व कंपनी एकत्रितपणे दायित्व निभावणार असलेले कार्ड कार्डधारकाला दिल्यानंतर अशा कार्डाच्या वापरामुळे निर्माण झालेले कार्डखात्यामधील सर्व शुल्कांचे दायित्व हे प्रत्येक कार्डधारकाचे व कंपनीचे एकत्रित आणि अनेकांगांनी असेल.

कार्डाच्या/कार्डांच्या वापरामुळे निर्माण झालेली सर्व शुल्के कार्डखात्यावर जमा होतील व त्याचे स्टेटमेंट आयसीआयसीआय बँक कंपनीला पाठवेल. मात्र कंपनीने तसे निर्देश दिलेले असल्यास, आयसीआयसीआय बँक स्टेटमेंट प्रत्येक कार्डधारकाला पाठवेल. अशी सर्व स्टेटमेंट्स ही कार्डधारकाला घालून दिलेल्या अटी पाळून सेटल करावी लागतील.

कंपनीने निर्देश केल्यामुळे स्टेटमेंट्स कार्डधारकाला पाठवली जात असली किंवा नसली तरीही कार्डखात्यावर येणाऱ्या सर्व शुल्कांच्या प्रती कंपनीच्या असलेल्या दायित्वावर कोणत्याही प्रसंगी कोणताही परिणाम होत नाही. संपकासाठी दिलेला बिलिंगचा पत्ता, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी यांच्यात कोणताही बदल झाल्यास तसे आयसीआयसीआय बँकेला ताबडतोब कळवण्याचे कंपनी मान्य करते.

## कार्ड निलंबित वा रद्द करणे

कार्डखाते किंवा कार्ड वा कार्डे परत घेण्याचा निर्णय आयसीआयसीआय बँक संपूर्णत: स्वत:च्या मर्जीने घेऊ शकते, त्यामागे कारण असो वा नसो आणि त्यासाठी बँकेवर कोणत्याही क्षणी कोणतेही दायित्व असणार नाही. कोणत्याही कार्डधारकाचे कार्ड आयसीआयसीआय बँकेने कंपनीच्या विनंतीनुसार मागे घेतल्यास वा रद्द केल्यास, आयसीआयसीआय बँक तसे कंपनीला कळवेल आणि कंपनी ताबडतोब, आपल्याला शक्य असलेल्या सर्व प्रयत्नांनिशी कार्ड परत घेतल्याचे /रद्द केल्याचे कार्डधारकाला कळवेल आणि परत घेतलेले/ रद्द केलेले प्रत्येक कार्ड परत मिळवून, त्याचे चार तुकडे करून होलोग्रॅम व मॅग्नेटिक स्ट्रीप नष्ट

झाल्याची खात्री करून ते आयसीआयसीआय बँकेला परत देईल. कंपनी आणि किंवा कार्डधारक कोणत्याही क्षणी कारणे देऊन वा न देता आणि आयसीआयसीआय बँक लिमिटेड, आयसीआयसीआय बँक फोन बँकिंग सेंटर, पी. ओ. बॉक्स नंबर 20, बंजार हिल्स, पी.ओ. हैदराबाद 500 034, भारत या पत्त्यावर 45 (पंचेचाळीस) दिवसांची लेखी पूर्वसूचना देऊन आयसीआयसीआय बँकेला कोणत्याही कार्डधारकाला दिलेले कार्ड रद्द करण्याची विनंती करू शकतात.

कार्ड परत घेतलयनंतर/रद्द केल्यानंतर आणि इथे वर्णन केल्यानुसार कार्ड आयसीआयसीआय बँकेला परत देईपर्यंत कार्डावर निर्माण झालेल्या सर्व शुल्कांचे दायित्व कंपनीवर राहील. कंपनी आयसीआयसीआय बँकेच्या सर्व नुकसानीपासून बचाव करेल आणि रद्द करण्यासाठी (योग्य वा अयोग्य) कार्डावरील कोणत्याही/ सर्व तोट्यातील आयसीआयसीआय बँकेला अपायकारक ठरवणार नाही. कंपनीने कार्ड रद्द करण्याची नोकरीवरून काढून टाकण्याची सूचना केल्यास ती लेखी देऊन बँकेने ती स्वीकारल्यानंतरच ग्राह्य मानली जाईल.

**माहितीचा मार्ग**

आयसीआयसीआय बँकेने योग्य प्रकारे मागणी केलेली कोणतीही माहिती कंपनी आयसीआयसीआय बँकेला देईल. यात कोणत्याही कार्डधारकाचा पत्ता, त्याच्या /तिच्याविषयीची माहिती किंवा नोकरीची माहिती किंवा कार्डधारकाचा कार्डाचा वापर यांचा समावेश असेल आणि कंपनी आयसीआयसीआय बँकेला तशी विनंती केल्यास, उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती किंवा अशा वापरांशी संबंधित माहितीही देईल कार्डाच्या वापराशी संबंधित कोणत्याही शोधासाठी, वादासाठी, दाव्यासाठी किंवा कायदेशीर कारवाईसाठी कंपनी आयसीआयसीआय बँकेला सर्व सहकार्य करेल.

**समाप्ती**

आयसीआयसीआय बँक व कंपनी, दोघेही ही योजना कोणत्याही क्षणी थांबवू शकतात, मात्र त्यासाठी दुसऱ्या पक्षाला 45 दिवसांची नोटीस दिलेली असणे आवश्यक आहे. या योजनेच्या समाप्तीमुळे कार्डखात्यावरील सर्व कार्डे रद्द ठरवली जातील. कार्डे रद्द झाल्यानंतरही, ही योजना रद्द करण्यापूर्वी आणि रद्द होत असताना निर्माण झालेल्या सर्व शुल्कांचे दायित्व आणि/किंवा कार्डखाते, कार्डखात्यावरील रद्द झालेली कार्डे वर उल्लेख केल्यानुसार आयसीआयसीआय बँकेला परत मिळेपर्यंत कंपनीकडे राहील.

पूरक कार्डे, बॅलन्स ट्रान्सफर सुविधा, आयअश्युअर सेवा आणि व्यापारी आधारित प्रस्थापना हप्ता योजना या कॉर्पोरेट क्रेडिट कार्डावर लागू नाहीत.

आयसीआयसीआय ईझी डिपॉझिट कार्ड हे आयसीआयसीआय बँक त्यांच्याकडे कार्डधारकाने ठेवलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या समक्ष दिले जाणारे क्रेडिट कार्ड आहे. (ह्यापुढे ज्याचा उल्लेख ''इझी डिपॉझिट कार्ड'' असा केला जाईल)

हे ईझी डिपाझिट कार्ड हे आयसीआयसीआय बँक त्यांच्याकडे कार्डधारकाने ठेवलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या समक्ष दिले जाणारे क्रेडिट कार्ड आहे. (ह्यापुढे ज्याचा उल्लेख ''ईझी डिपॉझिट कार्ड''असा केला जाईल)

हे ईझी डिपॉझिट कार्ड मिळण्यासाठी अर्जदाराने आयसीआयसीआय बँकेकडे किमान रु. 10,000 रकमेचे फिक्स्ड डिपॉझिट ठेवणे गरजेचे आहे.

सदरहू ईझी डिपॉझिट कार्ड मिळवण्यासाठी आवश्यक असणारे फिक्स्ड डिपॉझिट/ फिक्स्ड डिपॉझिट्स विहित अर्जाचा मसुदा रीतसर भरून किंवा आयसीआयसीआय बँक वेळोवेळी निर्देशित करील त्या पद्धतीने उघडायला हवे. फोन बँकिंग, मोबाइल बँकिंग आणि /किंवा इटरनेट बँकिंग चॅनेल्स वापरून केलेले अर्ज ह्यातून वगळले जातील. अशा पद्धतीने उघडण्यात आलेल्या फिक्स्ड डिपॉझिट्सचे वार्षिक धर्तीवर नूतनीकरण केले जाईल आणि संबंधित अटी व शर्ती ह्यांच्या जोडीनेच WWW.icicibank.com येथे फिक्स्ड डिपॉझिट्सच्या बाबतीत उपलबध असलेल्या अटी व शर्ती देखील लागू होतील.

ईझी डिपॉझिट कार्डावरील क्रेड्टि का लिमिट हे फिक्स्ड डिपॉझिटच्या रकमेच्या नव्वद टक्के (90%) असेल, ज्याची किमान रक्कम रु. 9000 व कमाल रक्कम रु. 3 लाख असेल. हे क्रेडिट लिमिट सर्वस्वी आयसीआयसीआय बँकेच्या निर्णयानुसार वेळोवेळी आयोजल्या जाणाऱ्या बदलाच्या सापेक्ष राहील.

सदरहू ईझी डिपॉझिट कार्ड जारी केल्यांतर, आयसीआयसीआयबँक कार्डधारकाने ठेवलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या संपूर्ण रकमेवर **''लिएन''** मार्क करील, ज्यामधून ईझी डिपॉझिट कार्ड वा फिक्स्ड डिपॉझिट, ह्यापैकी जे काही असेल ते, निलंबित केले जाईपर्यंत त्यावर मिळणारे व्याज वगळण्यात येईल.

अर्जदाराने जर आयसीआयसीआय बँकेकडे अगोदरच फिक्स्ड डिपॉझिट ठेवलेले असेल तर फिक्स्ड डिपॉझिटची रक्कम ही अर्जदाराच्या कार्ड अकाउंटबरोबर जोडली जाईल आणि फिक्स्ड डिपॉझिटचे परिवर्तन तात्काळ ''ऑटो–रिन्यूअल मोड''मध्ये परिवर्तन केले जाईल आणि सदरहू फिक्स्ड डिपॉझिटच्या रकमेला व्याजाचा प्रचलित दर लागू होईल.

कार्ड अकाइंटबरोबर जोडलेल्या फिक्स्ड डिपॉझिटमधून कार्डधारकाला कोणतीही अंशत: रक्कम काढण्याचा अधिकार राहणार नाही.

आयसीआयसीआय बँक ईझी डिपॉझिट कार्ड मिळवण्यासाठी उघडलेल्या फिक्स्ड डिपॉझिटचा कालावधी किमान एक वर्षाचा राहील. त्यानंतर निलंबित वा रद्द होईपर्यंत, फिक्स्ड डिपॉझिट ''ऑटो–रिन्यूअल मोड'' मध्ये सुरु राहील.

एचयूएफ, पार्टनरशिप फर्म्स द्वारा उघडण्यात आलेली फिक्स्ड डिपॉझिट्स ईझी डिपॉझिट कार्डसाठी पात्र ठरणार नाहीत.

अर्जदाराने अन्य कुणा व्यक्तीबरोबर संयुक्तपणे फिक्स्ड डिपॉझिट अकाउंट उघडला असल्यास अर्जाच्या मसुद्यामध्ये पुरव्यात आलेल्या तपशिलांच्या अनुसार केवळ पहिल्या अकाउंटधारकाच्या नावे ईझी डिपॉझिट कार्ड जारी केले जाईल. अर्जदाराने उघडलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या संदर्भात अर्जदाराला नामनिर्देशाचा अधिकार राहील.

कार्डधारकाला फिक्स्ड डिपॉझिटची रक्कम काढून घेण्याची /निलंबित करण्याची इच्छा असल्यास किंवा कार्डधारकाने/ आयसीआयसीआय बँकेने ईझी डिपॉझिट कार्ड रद्द केलेले असल्यास किंवा कार्डधारकाच्या निधनानंतर फिक्स्ड डिपॉझिट निलंबित करण्यात आल्यास कार्डधारक /नामनिर्देशित व्यक्ती, आयसीआयसीआय बँकेला येणे असलेल्या कोणत्याही चार्जेस रक्कम वजा करून संचयित व्याजासह फिक्स्ड डिपॉझिटची बाकी रक्कम मिळण्यासाठी पात्र राहील.

कार्डधारक जर ईझी डिपॉझिट कार्डवरील थकबाकीची रक्कम स्टेटमेंटच्या तारखेपासून 90 दिवसांच्या आत भरू शकला नाही तर फिक्स्ड डिपॉझिटची संपूर्ण रक्कम गोठवण्यासाठी आणि ईझी डिपॉझिट कार्डाच्या समक्ष, आयसीआयसीआय बँकेला देय असलेली थकबाकीची रक्कम फिक्स्ड डिपॉझिटच्या रकमेतून वळती करून घेण्याच्या आणि ही रक्कम कापून घेतल्यानंतर उरलेली रक्कम कार्डधारकाला चुकती करण्याचा अधिकार आयसीआयसीआय बँकेला राहील.

**आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : लँडमार्क, रेसकोर्स सर्कल, बडोदा 390 007

कॉरपोरेट कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा पूर्व, मुंबई – 400 051.

**कृपया ह्याची दखल घ्या की ह्या अटी व शर्तींचा मजकूर हा इंग्रजी तर्जुम्याचे भाषांतर आहे आणि इंग्रजी तर्जुमा व प्रस्तुत मराठी तर्जुमा ह्यामध्ये कोणतीही विसंगती वा संदिग्धता जाणवल्यास, इंग्रजी तर्जुमा हा ग्राह्य धरला जाईल. सर्वच प्रकरणी आणि मतभेदांच्या प्रकरणी इंग्रजी तर्जुमा हा ग्राह्य धरला जाईल.**